# अनुसूचित जमाती कल्याण समिती

## २०१०-२०११

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

नाशिक आदिवासी विकास आयुक्तालय या कार्यालयाअंतर्गत राज्यातील अप्पर आयुक्त निहाय आदिवासी उपयोजना क्षेत्राअंतर्गत व बाह्य क्षेत्राअंतर्गत अनुसूचित जमातीच्या अधिकारी/कर्मचारी यांचे भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्याकरिता राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक व सामूहिक लाभाच्या कल्याणकारी योजना या संबंधीचा अहवाल

# तिसरा अहवाल

(हा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहाला दिनांक २६ जुलै, २०१० रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१०

# अनुसूचित जमाती कल्याण समिती
## २०१०-२०११

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

# तिसरा अहवाल

एचबी १५००—१

# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

## अनुसूचित जमाती कल्याण समिति

## २०१०-२०११

### समिती प्रमुख

(१) श्री. सुरेश धस, वि.स.स.

### सदस्य

(२) श्री. आनंदराव गेडाम, वि.स.स.

(३) श्री. रामरतनबापू राऊत, वि.स.स.

(४) श्रीमती निर्मला गावित, वि.स.स.

(५) श्री. राजाराम ओझरे, वि.स.स.

(६) श्री. जगदीशचंद्र जगदीशभाऊ वळवी, वि.स.स.

(७) श्री. किसन कथोरे, वि.स.स.

(८) श्री. उमाजी बोरसे, वि.स.स.

(९) ॲड. चिंतामण वनगा, वि.स.स.

(१०) श्री. दौलत दरोडा, वि.स.स.

(११) श्री. धनराज महाले, वि.स.स.

(१२) श्री. एम. एम. शेख, वि.प.स.

(१३) श्री. राजेंद्र मुळक, वि.प.स.

(१४) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.

(१५) श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. म. मु. काज, उप सचिव.

(३) श्री. ला. ना. जाधव, अवर सचिव (समिती).

(४) श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी.

# प्रस्तावना

मी, अनुसूचित जमाती कल्याण समितीचा प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून समितीचा तिसरा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

समितीने नाशिक आदिवासी विकास आयुक्तालय या कार्यालया अंतर्गत राज्यातील अप्पर आयुक्त निहाय आदिवासी उपयोजना क्षेत्राअंतर्गत व बाह्य क्षेत्राअंतर्गत सन २००७-०८ ते सन २००९-१० या तीन वर्षात आदिवासी विकास विभागास मंजूर करण्यात आलेला निधी, झालेला खर्च अनुसूचित जमातीच्या अधिकारी व कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष त्याचप्रमाणे जातपडताळणी प्रमाणपत्राबाबत तसेच त्यांच्याकरिता राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक व सामूहिक लाभाच्या कल्याणकारी योजनांबाबत प्रश्नावली तयार करून संबंधित विभागाकडे पाठविण्यात आली. सदर प्रश्नावलीच्या अनुषंगाने समितीस प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक २८ ते ३० एप्रिल २०१० या कालावधीत आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक या कार्यालयास प्रत्यक्ष भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. समितीला प्रश्नावलीच्या संदर्भात प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच प्रत्यक्ष बैठकीच्या वेळी मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ६ जुलै २०१० रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. प्रत्यक्ष भेटीच्या व साक्षीच्या वेळी मिळालेल्या माहितीवर सखोल विचार करून समितीने त्या संदर्भात नोंदविलेले आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

विभागीय सचिवांनी तसेच इतर संबंधित अधिकाऱ्यांनी समितीस माहिती देऊन केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीने प्रारुप अहवाल दिनांक २३ जुलै २०१० रोजीच्या बैठकीत विचारात घेतला व तो संमत केला.

**सुरेश धस,**
समिती प्रमुख,
अनुसूचित जमाती कल्याण समिती.

**विधान भवन :**
मुंबई, दिनांक २३ जुलै २०१०.

# अहवाल

महाराष्ट्र राज्याचे भौगोलीक क्षेत्र ३,०७,७१३ चौ.कि.मी. एवढे असून त्यापैकी ५०,७५७ चौ.कि.मी. क्षेत्र आदिवासी उपयोजनेखाली येते. याचे प्रमाण १६.५ टक्के एवढे होते. गेल्या चार दशकांतील राज्याची लोकसंख्या व आदिवासी लोकसंख्या यांची तुलनात्मक आकडेवारी खाली देण्यात आली आहे :—

| जनगणना वर्ष | राज्याची एकूण लोकसंख्या (लाखात) | आदिवासी लोकसंख्या (लाखात) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १९७१ | ५०४.१२ | ३८.४१ | ७.६२ |
| १९८१ | ६२७.८४ | ५७.७२ | ९.१९ |
| १९९१ | ७८९.३७ | ७३.१८ | ९.२७ |
| २००१ | ९६८.७९ | ८५.७७ | ८.८५ |

महाराष्ट्र राज्यात एकूण ४५ अनुसूचित जमाती आहेत. त्यात मुख्यत्वे भिल्ल, गोंड, महादेव कोळी, पावरा, ठाकुर, वारली या प्रमुख आदिवासी जमाती आहेत. कोलाम (यवतमाळ जिल्हा), कातकरी (मुख्यत: रायगड व ठाणे जिल्हा) आणि माडिया गोंड (गडचिरोली जिल्हा) या केंद्र शासनाने आदिवासी जमाती म्हणून अधिसूचित केलेल्या अशा तीन जमाती आहेत.

राज्यात एकूण ३५ जिल्हे आहेत आणि आदिवासींची संख्या मोठ्या प्रमाणात धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक व ठाणे (सह्याद्री प्रदेश), चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर, अमरावती व यवतमाळ (गोडवन प्रदेश) या पूर्वेकडील वनाच्छादित जिल्ह्यांमध्ये मुख्यत: अधिक आहे.

१९७५-७६ या वर्षी भारत सरकारने निर्देश दिल्याप्रमाणे ज्या गावांतील आदिवासी संख्या एकूण लोकसंख्येच्या ५० टक्याहून अधिक असेल त्या गावांचा समावेश एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामध्ये (आयटीडीपी) करण्यात आला. भारत सरकारने मान्यता दिलेले अशाप्रकारे १६ प्रकल्प होते. नंतर ज्या गावांमधील आदिवासींची लोकसंख्या ५० टक्यापेक्षा किंचतशी कमी होती त्या गावांचा समावेशही अशा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रामध्ये करण्यात आला आणि अशी क्षेत्रे अतिरिक्त आदिवासी उपयोजना (एटीएसपी गट/प्रकल्प) म्हणून ओळखण्यात येऊ लागली. राज्य शासनाची मान्यता मिळालेली अशी ४ अतिरिक्त आदिवासी उपयोजना प्रकल्प क्षेत्रे आहेत. अशारितीने सध्या एकूण प्रकल्प अधिकाऱ्यांची संख्या २४ आहे.

दरम्यानच्या काळात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रालगतच्या प्रदेशातही काही ठिकाणी आदिवासींची वस्ती असल्याचे भारत सरकारच्या लक्षात आले. म्हणून सुमारे १०,००० लोकवस्तीच्या गावांमध्ये आदिवासींची संख्या ५० टक्याहून अधिक असेल तर अशा गावांचा समावेश सुधारित क्षेत्र

विकास खंडामध्ये (माडा) करण्यात यावा असे निर्देश देण्यात आले. त्याचप्रमाणे एकूण ५,००० लोकवस्तीच्या दोन किंवा तीन गावांमध्ये ५० टक्याहून अधिक आदिवासींची संख्या असेल तर, त्या गावांचा समावेश मिनीमाडा क्षेत्रामध्ये करण्यात यावा, अशा सूचना होत्या. महाराष्ट्रामध्ये एकूण ४३ माडा क्षेत्रे आणि २४ मिनीमाडा क्षेत्रे आहेत.

(एक) आदिवासींची सामाजिक व आर्थिक उन्नती होऊन त्यांचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने शासनाने दिनांक १ मे १९८३ रोजी स्वतंत्ररित्या आदिवासी विकास विभागाची निर्मिती केली आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या ९.६८ कोटी असून त्यापैकी ८.८५% म्हणजेच ८५.७७ लक्ष आदिवासींची लोकसंख्या आहे. राज्यात आदिवासींच्या एकूण ४५ जमाती आहेत.

(दोन) भारताच्या संविधानातील राज्य धोरणाच्या निदेशक तत्त्वांच्या अंमलबजावणीचा भाग म्हणून राज्य शासन आदिवासींच्या सर्वांगीण विकासाच्या उद्देशाने आदिवासी उपयोजना राबवित आहे. सन १९७५-७६ पासून म्हणजे पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या प्रारंभापासून प्रचलित आदिवासी उपयोजनेची सुरूवात झाली. आदिवासी उपयोजनेची मूळ संकल्पना ही क्षेत्र विकासाच्या संकल्पनेवर मुख्यत्वे आधारित होती. आदिवासी लोकसंख्या जास्त प्रमाणात असलेल्या अनुसूचित क्षेत्राचे विशेष विकास गट (एकात्मिक आदिवासी विकास गट) पाडून या क्षेत्रात सर्व विभागांतर्फे जो काही विकासावर खर्च होईल त्याचे तसेच प्रामुख्याने मुलभूत सोयी उभारण्यावर होणारी गुंतवणूक याचे पूर्ण नियंत्रण आणि वेगळा हिशोब ठेवला जावा या संकल्पनेने दरवर्षी आदिवासी उपयोजनेंतर्गत विविध विकास योजना राबविण्यात येतात. सन १९८६ पासून नियोजनाचा मुख्य उद्देश आदिवासी कुटुंबांचा विकास असावा असे मानून आदिवासी उपयोजना क्षेत्राच्या बाहेरील आदिवासींवर वैयक्तिक लाभाच्या योजनांतर्गत होणारा खर्च हा सुद्धा आदिवासी उपयोजनेत समाविष्ट करण्यात आला. याप्रमाणे आदिवासी उपयोजनेत व आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर आदिवासी विकासासाठी होत असलेला खर्च एकत्रित करून आदिवासी उपयोजना अंमलात आणली जात आहे.

(तीन) आदिवासी उपयोजनेची मुख्य उद्दिष्टे प्रामुख्याने खालीलप्रमाणे आहेत :—

(१) राज्यातील आदिवासी क्षेत्रे व इतर क्षेत्रे यांच्या विकासातील अंतर भरुन काढणे,

(२) आदिवासींच्या राहणीमानाचा दर्जा सुधारणे,

(३) त्यांना भेडसावणाऱ्या महत्त्वाच्या समस्यांची सोडवणूक करणे आणि त्यांची पिळवणूक थांबविणे,

(४) त्यांची सामाजिक व आर्थिक विकासाची गती वाढविणे,

(५) राज्याच्या एकूण योजनाबद्ध आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या फळांचा योग्य हिस्सा

आदिवासींना मिळावा व त्या दृष्टीने योजनेंतर्गत होणाऱ्या खर्चाचा रास्त हिस्सा आदिवासी क्षेत्रासाठी व आदिवासींच्या विकासासाठी उपलब्ध व खर्च व्हावा.

अनुसूचित जमाती कल्याण समितीने सन २००७-२००८, २००८-२००९, २००९-२०१० या तीन वर्षांत आदिवासी विकास विभागास मंजूर करण्यात आलेला निधी, झालेला खर्च व अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजने अंतर्गत राज्यातील आदिवासी जमातीच्या विकासासाठी आदिवासी विकास विभागाकडून आदिवासी उपयोजना सेवाअंतर्गत व आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक व सामुहिक लाभांच्या योजनेबाबत प्रश्नावली तयार करून संबंधित विभागाकडे पाठविण्यात आली. सदर प्रश्नावलीच्या अनुषंगाने समितीस प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक २८ ते ३० एप्रिल २०१० या कालावधीत आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक येथे बैठका घेतल्या. सदर बैठकीस आदिवासी विभागांतर्गत असलेले चार अतिरिक्त आदिवासी आयुक्त, सर्व प्रकल्प अधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांसमवेत चर्चा केली.

समितीने सदरहू बैठकीत सन २००७-०८, २००८-०९, २००९-१० या तीन वर्षांत आदिवासी विकास विभागाला मंजूर करण्यात आलेला निधी, झालेला खर्च व अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजने अंतर्गत राज्यातील आदिवासी जमातीच्या विकासासाठी आदिवासी विकास विभागाकडून आदिवासी उपयोजना क्षेत्रा अंतर्गत व आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक व सामुहिक लाभाच्या योजना, केंद्र व राज्य शासनाच्या योजना, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ/शबरी विकास महामंडळ, नाशिक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी केंद्र व राज्य शासनाकडून मिळणारा निधी, झालेला खर्च, शासनाच्या विविध विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या आदिवासी विकासाच्या विविध योजनांसाठी देण्यात येणारा निधी व तत्संबंधीची अंमलबजावणी, शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तसेच वसतिगृहे, व्यवस्थापनेवरील त्रुटी व त्यावरील उपाययोजना तसेच अनुसूचित जमातीच्या कर्मचारी/अधिकारी यांचा विविध आस्थापनांमध्ये असणारा अनुशेष व राज्यातील जातपडताळणी समित्यांचे कार्य इत्यादी बाबत आयुक्त, आदिवासी विकास यांच्यासह नाशिक, ठाणे, अमरावती व नागपूर येथील अपर आयुक्त व सर्व प्रकल्प अधिकारी तसेच संबंधित महामंडळाचे अधिकारी व जात पडताळणी समितीचे अधिकारी यांच्याबरोबर समितीने पाठविलेल्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने चर्चा करून माहिती घेतली. तसेच समितीने नाशिक परिक्षेत्रातील काही आश्रमशाळा/ वसतीगृह इत्यादिंना भेटी दिल्या.

सदर बैठकीच्यावेळी आयुक्त आदिवासी विकास विभाग नाशिक यांनी पुढीलप्रमाणे माहिती दिली.

सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याची एकूण लोकसंख्या ९६८.७९ लक्ष असून अनुसूचित जमातीची लोकसंख्या ८५.७७ लक्ष आहे. त्याचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण ८.८५ टक्के एवढे आहे.

आदिवासी विकास आयुक्तालयाचे साधारणपणे नाशिक, ठाणे, अमरावती व नागपूर असे ४ विभाग असून या विभागांमध्ये आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी अनुक्रमे २०.५७, ४.४०, ६.७४, १५.३१, ८.८५ एवढी आहे.

राज्यातील १४ जिल्ह्यांत आदिवासी उपयोजना क्षेत्र घोषित करण्यात आले असून धुळे जिल्ह्याचे विभाजन होऊन नंदूरबार या नवीन जिल्ह्याची १ मे १९९८ मध्ये निर्मिती झालेली आहे. तसेच भंडारा जिल्ह्याचे विभाजन होऊन गोंदिया या नवीन जिल्ह्याची निर्मिती झाली आहे. त्यामुळे आता १६ जिल्ह्यांत आदिवासी उपयोजना क्षेत्र आहे.

आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी कल्याणासाठी मागासवर्गीय कल्याणांतर्गत वैयक्तिक व सामुहिक योजना राबविण्यात येतात. वैयक्तिक लाभाच्या योजनांमध्ये न्युक्लिअस बजेट योजना, भूमिहीन दारिद्र्य रेषेखालील आदिवासींचे सबळीकरण व स्वाभिमान योजना, राज्यातील आदिवासी क्षेत्रामध्ये कन्यादान योजना, घरगुती गॅस युनिट पुरविण्याची योजना, म्हशी, गाई व शेळ्याचा गट पुरविण्याची योजना, शेतक-यांना वीजपंप/तेलपंप पुरविण्याची योजना, ग्रेड ३ व ४ च्या बालकांच्या पालकांना बुडीत मजुरी योजना, विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व वाहतूक भत्ता, मुलींचे, मुलांचे गळतीचे प्रमाण थांबविण्यासाठी शिष्यवृत्ती योजना, प्रोत्साहनपर बक्षिस योजना, आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण, परदेशात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अशाप्रकारच्या योजना राबविण्यात येतात.

सामुहिक स्वरूपाच्या योजनाही राबविण्यात येतात. शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, कनिष्ठ महाविद्यालये, शासकीय वसतिगृह, ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रम, युवकांना पोलीस व लष्कर नोकरीपूर्व प्रशिक्षण, बेरोजगार युवकांसाठी नाव नोंदणी, महिलांचे स्वयंसहाय्यता बचत गट, एकलव्य इंग्रजी माध्यमाच्या शाळा, आदर्श आश्रमशाळा, आरोग्यविषयक उत्थान कार्यक्रम, जन उत्कर्ष कार्यक्रम अशा स्वरूपाच्या सामुहिक योजना राबविण्यात येतात.

आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक २१ सप्टेंबर १९९२ नुसार आदिवासींच्या उपयोजनेसाठी राज्याच्या वार्षिक योजनेच्या एकूण आकारमानाच्या ९ टक्के निधी देणे बंधनकारक करण्यात आलेले आहे,

व त्याप्रमाणे अंमलबजावणीसुद्धा होत आहे. राज्यातील शिक्षणाचे प्रमाण ७७ टक्के आहे. आदिवासी भागामध्ये ५५ टक्के आहे. शिक्षण हा सर्वांगीण विकासाचा मुलभूत पाया आहे व याकडे लक्ष केंद्रीत करण्याकरिता आदिवासी विकास आयुक्तालयाकडून आदिवासी मुलांच्या शिक्षणावर भर देण्यात येत आहे. आदिवासी विकास आयुक्तालयामार्फत एकूण ५५१ आदिवासी आश्रमशाळा सुरू करण्यात आल्या आहेत, शाळांच्या माध्यमातून २ लाख ७ हजार मुले शिक्षण घेत आहेत. अनुदानित आश्रमशाळांच्या माध्यमातून २ लाख ३५ हजार मुले शिक्षण घेत आहेत. राज्यात ४५८ शासकीय वसतिगृहे आहेत व त्यात ३५००० मुले शिक्षण घेत आहेत.

**अभिप्राय व शिफारशी :**

(१) समितीच्या नाशिक येथे झालेल्या दौऱ्याच्या वेळेस समितीने आदिवासी उपयोजनेंतर्गत असलेल्या काही कामाची पाहणी केली व त्या वेळी समितीस असे आढळून आले की, आदिवासींच्या विकासासाठी आदिवासींच्या हिताच्या व कल्याणासाठी/आदिवासी उपयोजनेंतर्गत व आदिवासी उपयोजनेच्या वाटप क्षेत्रात वैयक्तिक व सामुहिक कामांच्या योजना केंद्र व राज्य शासनाच्या योजना, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, शबरी विकास महामंडळ इत्यादींकडून कामासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग, वन विभाग, जलसंपदा विभाग, शालेय शिक्षण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग इत्यादी विभागांत निधी दिला असल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

आदिवासी जनतेच्या विकासासाठी देण्यात आलेली रक्कम काही ठिकाणी पूर्ण खर्च करण्यात आली आहे. तर काही ठिकाणी त्याच्या उलट झाल्याचे दिसून आले. आदिवासी विकास विभागाकडून करण्यात आलेली तरतूद आणि झालेला खर्च यामध्ये जवळपास ११० कोटी रुपयांची तफावत दिसत आहे. संबंधितांकडून ११० कोटी रूपयांचा जास्तीतजास्त खर्च झालेला आहे, असे यातून दिसत आहे. आदिवासी विकासाचा पैसा कामे करण्यासाठी इतर विभागांकडे जातो. इतर विभागांनी जवळपास ११० कोटी रुपयांचा जास्तीतजास्त खर्च केला आहे. या ठिकाणी २१ टक्के कॉन्टीजन्सी चार्जेस लावले जातात, हे काही योग्य नाही. ३३५ कोटी रुपयांची तरतूद असताना खर्च मात्र ४४५ कोटी रुपये होतो. कॉन्टिजंन्सी चार्जेसचा पैसा वाचवून इतर भागांमध्ये आदिवासींसाठी योजना करता आल्या असता, आदिवासींचे प्रश्न सुटले असते. त्या रकमेतून नवनवीन योजना करता आल्या असत्या. आदिवासी विकास आयुक्तालयाकडून इतर विभागांना आदिवासी विकासासाठी निधी दिला जातो, परंतु तो निधी योग्यरित्या आदिवासी जनतेच्या विकासाच्या योजनांवर खर्च होत आहे की नाही, हे मात्र पाहिले जात नाही. त्या संबंधात आयुक्त कार्यालयाकडे वेगळी यंत्रणा नाही. आदिवासी विकास आयुक्त कार्यालयाचे त्यावर नियंत्रण राहत नाही. निधीचे मालक आदिवासी विकास आयुक्त पण निधीचा वापर मात्र इतर विभाग करतात, व निधीतून योजना पूर्ण होतात की नाहीत, हे देखील पाहण्यासाठी यंत्रणा नाही, असे समितीला खेदाने नमूद करावे लागते.

आदिवासींच्या विकासासाठी शासनाने दिलेला निधी लोकांच्या विकास कामासाठी योग्य रितीने येतो की, नाही याचा पाठपुरावा किंवा नियंत्रण करण्यासाठी आदिवासी विकास विभागाकडे यंत्रणा नाही. त्यामुळे शासनाने राज्याच्या एकूण अर्थसंकल्पापैकी ९ टक्के रक्कम आदिवासींच्या कल्याणासाठी देऊनही खऱ्या अर्थाने आदिवासी जनतेचे जनजीवन सुधारण्याचे दिसून येत नाही. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते.

**म्हणून समिती अशी शिफारस करते की, आदिवासी जनतेच्या विकासासाठी शासनाकडून मिळालेली अर्थ संकल्पामधील परत दर्शविलेली रक्कम आदिवासी उपयोजनेंतर्गत व आदिवासी उपयोजनेच्या बाहेर असलेल्या आदिवासी जनतेने कल्याण व हित जोपासण्याच्या दृष्टिने खर्च होणे आवश्यक आहे. आदिवासी विकास विभागा व्यतिरीक्त इतर विभागाकडून खर्च करण्यात आलेल्या रकमेवर आदिवासी विकास विभागाचेच नियंत्रण असणे आवश्यक आहे. त्यासाठी आदिवासी विकास विभागाने तांत्रिक अधिकारी व कर्मचाऱ्यांची नेमणूक करून आदिवासी जनतेच्या हितासाठी व विकासासाठी इतर विभागाकडे दिलेल्या रकमेवर व झालेल्या खर्चावर विभागीय पातळीवर आदिवासी विभागाकडून नियंत्रण ठेवण्यात यावे व आदिवासींच्या कल्याणासाठी राबविण्यात आलेल्या योजनांचा व झालेल्या खर्चाचा तसेच आर्थिक व्यवहाराचा तपशील दर तीन महिन्यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्यामार्फत शासनाकडे सादर करण्यात यावा, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

(२) समितीच्या असेही निदर्शनास आले आहे की, आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्रात जे आदिवासी समाजाचे लोक राहतात त्यांना आदिवासी विभागामार्फत सुरू करण्यात आलेल्या योजनांचा लाभ मिळत नाही व त्यामुळे त्यांची आर्थिक उन्नती होत नाही त्यामुळे ते पाठीमागे राहतात. जर आपल्याला उदाहरणच द्यायचे झाले तर बीड जिल्ह्यात जे आदिवासी समाजाचे लोक राहतात. त्यांना आदिवासी विकास योजनांचा लाभ मिळत नाही. आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये गॅस युनिट पुरविले जातात. परंतु, इतर विभागातील आदिवासींना या योजनेचा लाभ मिळालेला नाही. बीड जिल्ह्यात पारधी, भिल्ल ठाकूर, महादेव कोळी ठाकूर समाजातील लोक मोठ्या प्रमाणात आहेत. आदिवासींमध्ये एकूण ८५ पोटजाती आहेत. त्यामुळे आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासी समाज आणि इतर क्षेत्रातील आदिवासी समाज यांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळण्यात मोठी विसंगती आहे. इतर क्षेत्रातील आदिवासी समाजाने १६ जिल्ह्यांतील आदिवासी उपयोजना क्षेत्रात जाऊन राहायचे का असे समितीने पृच्छा केली असता समितीस असे सांगण्यात आले की, पारधी समाजाच्या विकासासाठी एक वेगळी योजना शासनाने घेतलेली आहे.

मागील वर्षी व यावर्षी देखील ही योजना राबविली असून यासाठी २० कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. केंद्र शासनाची देखील योजना असून त्या माध्यमातून त्यांना मदत करण्यात येते. ओ.टी.एस.पी क्षेत्रामध्ये व्यक्तीगत लाभाच्या योजनांचा लाभ देण्यात येतो. तथापि पायाभूत सुविधांची कामे ओ.टी.एस.पी. क्षेत्रामध्ये घेता येत नाहीत. याबाबत समितीने असे निदर्शनास आणले की, बीड व जिल्ह्यातील काही भागात पारधी, भिल्ल, ठाकर व काही प्रमाणात महादेव कोळी व ठाकर या समाजातील लोक आहेत. ओ.टी.एस.पी क्षेत्रासाठी जो प्लॅन तयार केला जातो तो अतिशय छोट्या प्रमाणात केला जातो. व्यक्तिगत लाभाच्या योजनांचा उल्लेख येथे करण्यात आला परंतु बीड जिल्ह्यात शिलाई मशिनचे वाटप किती आदिवासींना करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे भिल्ल समाज देखील आहे. मासेमारीचा व्यवसाय ते लोक करतात त्यांना कोणत्या योजनेचा लाभ देण्यात आला आहे. याबाबत समितीस समाधानकारक माहिती मिळू शकली नाही.

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील व उपयोजना क्षेत्रा बाहेरील दोन भागांमध्ये आदिवासींसाठी योजना राबविण्यात येत असतात. टी.एस.पी क्षेत्रासाठी किती निधी खर्च करण्यात येतो व ओ.टी.एस.पी क्षेत्रासाठी किती निधी खर्च करण्यात येतो ? याची माहिती शासनाने घेतली तर आदिवासींना खरा न्याय मिळेल असे समितीस वाटते. या संदर्भात काही नियम तयार करण्यात आले आहेत का ? या दोन्ही क्षेत्रांसाठी किती तरतूद करावी, यासंदर्भात शासनाने काही निकष ठरवून दिलेले आहेत का, असे समितीने विचारणा केली असता समितीस असे सांगण्यात आले की, अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येते. आदिवासी उपयोजनेसाठी ९ टक्के निधीची तरतूद करण्यात आली तर जिल्हा स्तरासाठी ६० टक्के व राज्यस्तरासाठी ४० टक्के निधी देण्यात येतो. या निधी पैकी टी.एस.पी साठी ८५ टक्के व ओ.टी.एस.पी.साठी १५ टक्के निधीची तरतूद करावयाची असते. टी.एस.पी.साठी असलेल्या ८५ टक्के तरतुदीतून मुलभूत सुविधांसाठी ८० टक्के व वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी २० टक्के निधी खर्च करावयाचा असतो. मुलभूत सुविधांसाठी ८० टक्के निधी लोकसंख्येच्या प्रमाणात देतो. वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी २० टक्के निधी त्या त्या भागाप्रमाणे देण्यात येतो. ओ.टी.एस.पी.साठी १५ टक्के निधीची तरतूद करताना एरियाचा विचार न करता लोकसंख्येच्या प्रमाणात तरतूद करण्यात येते. या बाबतीत समितीने अशी पृच्छा केली की, ओ.टी.एस.पी.क्षेत्रामध्ये राहणा-या आदिवासी समाजांची संख्या किती आहे, हे लक्षात घेऊन लोकसंख्येच्या टक्केवारीनुसार निधी वितरित केला तर ख-या अर्थाने आदिवासी समाजाला न्याय मिळेल. राज्य शासन तसेच जिल्हास्तरावरील निधी मोठ्या प्रमाणावर टी.एस.पी.क्षेत्रासाठी खर्च करण्यात येतो. आताच आदिवासी विकास आयुक्तांनी समितीला माहिती दिली की, अनुसूचित जमातीची एकूण लोकसंख्या ८५,७७,२७६ एवढी आहे. म्हणजेच ८.८५ टक्के एवढी आहे. राज्यातील १६ जिल्ह्यांत टी.एस.पी.क्षेत्र घोषित करण्यात आलेले आहे. एकूण ८.५८ टक्के लोकसंख्यापैकी टी.एस.पी.क्षेत्रातील आदिवासींची लोकसंख्या किती

आहे. याबाबत समितीस असे सांगण्यात आले की, आदिवासी उपाययोजना सेवामध्ये आदिवासींची लोकसंख्ये ३५ लाख एवढी आहे व आदिवासी उपयोजने बाहेरील आदिवासींची लोकसंख्या ५० लाख एवढी आहे. याबाबत समितीने असे मत व्यक्त केलेली, आदिवासी विकास विभागासाठी करण्यात आलेल्या एकूण तरतुदीपैकी ८५ टक्के निधी ३५ लाख लोकसंख्येसाठी खर्च करीत आहोत व ५० लाख लोकसंख्येसाठी केवळ १५ टक्के निधी खर्च करीत आहोत ठाणे जिल्ह्यात शहापूर सारखा मोठ्या आदिवासी पट्टा आहे. त्या भागावर अन्याय होतो. आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्रासाठी साधी घरकुलेही आदिवासींना मिळालेली नाहीत आणि आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये आपण गॅस संच देण्यापर्यंत आपण आलो आहोत. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासी समाजाला ज्या ज्या योजनांचा लाभ मिळालेला आहे, त्याबद्दल समितीची काहीही हरकत नाही, परंतु, ओ.टी.एस.पी.मधील अनेक आदिवासी लोक आजही झोपड्यांमध्ये राहतात आणि अशा आदिवासींची लोकसंख्या ५० लाख एवढी आहे. त्यांच्यासाठी आपण केवळ १५ टक्के निधी खर्च करीत आहेत. हा एक प्रकारचा आदिवासी उपयोजने बाहेरील आदिवासींवर अन्याय आहे. अशा प्रकारे एकाच राज्यात आदिवासी समाजाच्या जनतेस सावत्र भावाची वागणूक देऊन त्याच समाजाबाबत सामाजिक द्वेष निष्पण करण्याचे काम शासनाकडून केले जात आहे. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते व अशा एकाच राज्यामध्ये एकाच समाजाच्या लोकांना वेगवेगळी वागणूक देणे, या शासनाच्या निर्णयाबाबत तीव्र नापसती व्यक्त करीत आहे.

**म्हणून याबाबत समिती अशी शिफारस करते की, राज्यातील आदिवासी जनतेची खऱ्या अर्थाने उन्नती करायची असेल किंवा त्यांना जनतेच्या व प्रगतीच्या मुळ प्रवाहामध्ये आणावयाचे असेल तर राज्यातील आदिवासीसाठी लादण्यात आलेले आदिवासी उपयोजना क्षेत्र व आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील आदिवासीना समान न्याय देणे आवश्यक आहे. म्हणून सद्या असलेले क्षेत्रीय बंधन उठवून राज्यातील सर्व आदिवासींना समान न्याय मिळण्यासाठी मूलभूत सुविधा व वैयक्तिक लाभाच्या योजनेवर खर्च करण्यात यावा. तसेच राज्यातील सर्व आदिवासी जनतेस समान प्रगतीच्या सुविधांसाठी खर्च करण्याची तरतूद करण्यात यावी, ही समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

**३.** शासनाकडून आदिवासींच्या विकासासाठी एकूण अर्थसंकल्पाच्या ९ टक्के निधी दिला जातो, त्याचा योग्य व पूर्णपणे वापर होणे गरजेचे आहे. शासनाने दिलेला निधी पूर्णपणे आदिवासी विकासासाठी का खर्च होत नाही, हा एक मोठा प्रश्न आहे. दिलेला निधी वापरला नाही तर पुढील अर्थिक वर्षाच्या निधीवर परिणाम होऊ शकतो. आदिवासी समाजातील कामांच्या निविदा (टेंडर) काढण्यासाठी व इतर तत्सम बाबीसाठी जवळपास ११० कोटी रुपये खर्च केले आहेत. ऐवढ्या मोठ्या रकमेत आदिवासींना कितीतरी घरकुले देता आली असती. हा सर्व पैसा आदिवासींच्या विकासासाठी आहे. सुमारे ६०-७० टक्के आदिवासी लोकसंख्या असलेल्या ठिकाणी काहीही खर्च झालेला नाही. परंतु १० टक्के आदिवासी

लोकसंख्या असलेल्या ठिकाणी १०० टक्के खर्च झाला असल्याचे दिसत आहे. असे समितीच्या निदर्शनास आले आहे. या मागील विभागाची कल्पना समितीच्या लक्षात येत नाही. केंद्र शासनाचे अभिनंदन केले पाहिजे की, त्यांनी सुरूवातीला इ.जी.एस. योजना आणली, त्यांनतर तीयोजना एमआरईजीएसमध्ये रुपांतरित होऊन प्रथम १२ जिल्ह्यांत लागू केली. त्यानंतर इतर उर्वरित जिल्ह्यांत त्या योजनेच्या अंमलबजावणीस सुरूवात केली. परंतु, आदिवासी विकास विभागाने मात्र १६ जिल्ह्यांत काही ठराविक तालुक्यांबाबत बंधन घातले आहे, हे काही बरोबर नाही. जेथे खरोखर आदिवासी भाग आहे तेथे निधी खर्च करण्यात आलेला नाही. आदिवासी खरोखर या योजनांपासून वंचित आहेत. अशा आदिवासी विकास विभागाच्या अकार्यक्षम अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करणे आवश्यक आहे. असे समितीचे ठाम मत झाले आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागासाठी २१०० कोटी रुपयांचा नियतव्यय असताना फक्त ४४५ कोटी रुपये खर्च करण्यात येत आहेत आणि त्यातही २५ टक्के कॉन्टिंजन्सी चार्जेस म्हणून ११० कोटी रुपये ठेऊन प्रत्यक्षात मात्र ३३५ कोटी रुपये खर्च करण्यात येणे हे योग्य झाले नसल्याचे समितीचे मत झाले आहे. ११० कोटी रुपयांच्या कॉन्टिंजन्सी फंडाची रक्कम आपण आदिवासींच्या घरकुलासाठी दिली असती तर जे बेघर आदिवासी आहेत अशा लोकांना घरकुले झाली असती. प्रत्येक तालुक्यातील पारधी, ठाकर, महादेव कोळी इत्यादी जातीच्या बांधवांना ५-५ घरकुले मिळाली असती तरी ते आनंदी झाले असते. **म्हणून समिती अशी शिफासर करते की, शासनाकडून आदिवासींच्या विकासासाठी जो निधी दिला जातो तो निधी आदिवासींच्या पर्यंत पोहचवून त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या मुलभूत आणि वैयक्तिक लाभांच्या योजनेवर खर्च करणे आवश्यक आहे. सदर निधीचा लाभ खऱ्या अर्थाने गरीब आदिवासींपर्यंत पोहचवून त्यांना प्रगतीच्या प्रवाहात आणण्याचे काम प्रकल्प अधिकारी, अतिरिक्त आदिवासी विकास अधिकारी व संबंधित विभागाचे अधिकारी यांच्यावर आहे. जर आदिवासींचा पैसा त्यांच्या कल्याणासाठी खर्च केला नसेल किंवा आदिवासींच्या नावाने अन्य कामाकडे वळविला असेल तर त्या संबंधित प्रकल्प अधिकारी, अतिरिक्त आदिवासी विकास अधिकारी व संबंधित विभागाचे अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी. तसेच त्यांच्यावर फौजदारी गुन्हे सुद्धा दाखल करण्यात यावेत, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

४. आदिवासी मुला / मुलींमधील गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी व मुलामधील शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी या दृष्टीने इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या मुला / मुलींना शिष्यवृत्ती योजना शासनाने मंजूर केलेली आहे या योजनेंतर्गत इयत्ता ५ वी ते ७ वी पर्यंतच्या शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रतिमहा ५० रुपये या प्रमाणे वार्षिक ५०० रुपये प्रोत्साहन भत्ता देण्यात येत आहे. इयत्ता ८ वी ते इयत्ता १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना दरमहा १०० रुपये प्रमाणे एका वर्षासाठी रुपये १,००० प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय असल्याचे समितीस सांगण्यात आले.

समितीने राज्यात अनेक जिल्ह्यांमध्ये भेटी दिल्या असता समितीस असे आढळून आले की, विभागाकडून जो काही उपस्थित भत्ता देण्यात येतो, त्यासंदर्भात बऱ्याच जणांना त्याबाबतची कल्पना नसते. बऱ्याच शाळेत उपस्थित भत्ता व प्रोत्साहन भत्ता विद्यार्थ्यांना वेळेवर विद्यार्थ्यांना मिळत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. त्याच प्रमाणे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना उपस्थिती भत्ता मिळत नाही. इयत्ता दहावीतील मुले उतिर्ण होऊन पुढील शिक्षणासाठी बाहेर जातात. त्यामुळे त्यांना वेळेत भत्ता मिळत नाही. राज्यातील बऱ्याच शाळेतील मुख्याध्यापकांकडे भत्त्याचे पैसे अद्यापही पडून आहेत. परंतु त्या भत्त्याचे पैसे वितरित केलेले नाहीत. विद्यार्थ्यांना उपस्थिती भत्ता देण्याचा मुळ उद्देश असा आहे की, आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर होऊन विद्यार्थी आश्रमशाळेमध्ये शिक्षण घेण्यासंदर्भात अभिप्रित व्हावेत असा आहे. परंतु विद्यार्थ्यांना वर्ष संपले तरी पैसे मिळत नसतील तर उपस्थिती भत्ता देण्यामागील अर्थच संपुष्टात येतो, असे समितीचे मत असून या प्रकरणाबाबत समिती संबंधित शाळेतील मुख्याध्यापकांवर जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. **म्हणून समिती अशी शिफारस करते की, इयत्ता ५ वी ते ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या भत्त्याच्या रकमेमध्ये वाढ करून प्रत्येक विद्यार्थ्यांना दर महा रु. २००/- व ८ वी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना दरमहा रु. ४००/- उपस्थिती भत्ता देण्यात यावा सदर रकमेचे विद्यार्थ्यांना दर महिन्यातून एकदा वितरण करण्यात यावे. सदर भत्त्याची रक्कम ही विद्यार्थ्यांची बँकेत खाते उघडून त्यांच्या खातेमध्ये जमा करणेबाबत आश्रमशाळांना बंधनकारक करण्यात यावेत. याबाबत संबंधित प्रकल्प अधिकारी आणि सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांना पुन्हा एकदा शासन निर्णयाद्वारे आदेश निर्गमित करण्यात यावेत, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

**५.** राज्यात आदिवासीच्या कल्याणासाठी विविध योजना राबविण्यासाठी केंद्र शासनाकडून विशेष केंद्रीय सहाय्य योजनेंतर्गत निधी प्राप्त होतो. त्या प्रमाणे सन २००६-२००७ या वर्षासाठी पाठविलेल्या निधीतून आदिवासी मुलींसाठी विमान सेवेत ' हवाई सुंदरी ' या प्रशिक्षणासाठी दिनांक २४ मार्च २००७ रोजी एकूण ९५ मुली व ५ मुलांची निवड करून पुणे येथे पाठविण्यात आले.

समितीने चौकशी केली असता समितीस असे आढळून आले की, पुणे येथील 'हवाई सुंदरीचें' जे प्रशिक्षण आहे. त्या प्रशिक्षणास कॅंब्रिज युनिव्हरसिटीची मान्यताच नसल्याचे निदर्शनास आले आहे. सदर प्रशिक्षणास कॅंब्रिज युनिव्हरसिटीची मान्यताच नव्हती, त्यामुळे पुणे येथे 'हवाई सुंदरीच्या' प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आलेल्या आदिवासी मुलींची फसवणूक झाली असून सदर प्रशिक्षणासाठी एकूण सुमारे एक कोटी रुपये खर्च केल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. याबाबत विभागीय प्रतिनिधींना विचारले असता त्यांनी समितीस असे सांगितले की, आदिवासी मुलींना उच्च शिक्षण देण्याचा निर्णय झालेला आहे.

नॉर्थ इस्टमध्ये भरपूर मुली आदिवासी आहेत. त्यांना नोकरी मिळत नसल्यामुळे हा प्रयोग सुरू केल्याचे सांगण्यात आले. त्याच प्रमाणे १०० पैकी ९५ मुली व ५ मुलांना यासंदर्भात प्रशिक्षण देण्यात आले आहे. ९५ मुलींपैकी ३८ मुलींना निरनिराळ्या भागामध्ये नोकरी मिळाली आहे. ५ मुलींना एअर इंडियामध्ये एका मुलीस जेट एयरवेजमध्ये नोकरी मिळाली आहे. पण त्यांना हवाई सुंदरी बनविले असे नाही. अशा प्रकारे विभागीय प्रतिनिधींनी केलेल्या खुलाशावर समितीने संताप व्यक्त केला. आदिवासींच्या मुलींना 'हवाई सुंदरी ' या प्रशिक्षणासाठी निवड करून तेच प्रशिक्षण त्यांना देणे आवश्यक असताना त्यांना दुसरे शुल्लक प्रशिक्षण देऊन आदिवासींची फार मोठी निराशा केली आहे. हवाई सुंदरी प्रशिक्षणांसाठी शासनाचे एक कोटी रुपये खर्च केल्याचे दाखविले आहे. ही फार मोठी खेदाची बाब आहे. म्हणून समिती अशा प्रवृत्तीच्या अधिकाऱ्यांचा तीव्र निषेद व्यक्त करून समिती अशी शिफारस करते की, **आदिवासी मुलींना ' हवाई सुंदरी ' या प्रशिक्षणासाठी केंब्रिज युनिव्हरसिटीची मान्यता नसताना पुणे येथे प्रशिक्षणासाठी पाठवून शासनाचा सुमारे एक कोटी रुपये व्यर्थ घालविणाऱ्या जे संबंधित अधिकारी आहेत, त्यांच्यावर फसवणूकीचा फौजदारी गुन्हा दाखल करावा व झालेल्या खर्चाची वसुली त्यांच्याकडून करण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

६. मागील तीन चार वर्षात आदिवासी विकास विभागाला मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त झालेला असताना या विभागाकडे मोठ्या प्रमाणावरील रिक्त पदे, अपूर्ण कर्मचारी, प्रशिक्षीत शिक्षक व कर्मचारी तसेच समन्वय व सनियंत्रण करण्यासाठी पुरेशी यंत्रणा उपलब्ध नाही. तसेच कामाची गुणवत्ता तपासण्यासाठी तांत्रिक कर्मचाऱ्यांची यंत्रणा उपलब्ध नसल्याने आदिवासी भागात कामे पूर्ण होत नाहीत अशा प्रकारची पुरेशी तांत्रिक यंत्रणा आदिवासी विकास विभागाला उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आदिवासी विकास आयुक्तालयामार्फत शासनाकडे प्रस्ताव पाठवण्यात आला आहे काय व केव्हा तसेच या प्रकरणी शासन स्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे असे समितीने विचारले असता समितीस असे सांगण्यात आले की, विभागाचे रिऑर्गनायझेशन करण्याच्या संदर्भात विचार करण्यात येत असून आदिवासींच्या कल्याणासाठी विविध योजना चांगल्या प्रकारे कशा राबविता येतील यावर अधिक भर दिला जात आहे, त्यासाठी जी पदे रिक्त आहेत ती पदे भरण्यात यावीत असे शासनाने आदेश दिले होते. परंतु त्यामध्ये काही अडचणी येतात त्यातील एक अडचण अशी आहे की काही पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मार्फत भरली जातात त्यांच्याकडे पाठपुरावा केला जातो परंतु काही वेळा कार्यवाही लवकर होत नाही त्यामुळे पदे भरण्यात वेळ जातो याबाबत समितीने असे सूचित केले की, आदिवासी विकास आयुक्त कार्यालयामध्ये अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उप अभियंता तसेच कनिष्ठ अभियंता इत्यादी पदे असली पाहिजेत. ११० कोटी रुपये एक विभाग कॉन्टीजन्सी चार्जेस म्हणून घेतो त्यापैकी या कर्मचाऱ्यांच्या आस्थापनेवर १० कोटी रुपये खर्च झाला तरी त्याचा फायदा होईल. आपल्याच विभागामार्फत

हे पैसे खर्च व्हावयास पाहिजेत. पंतप्रधान ग्राम सडक योजने अंतर्गत साडेचार हजार किलोमिटर्स रस्त्याचे जाळे विणले गेले आहे. त्या कामाच्या मंजुरीसाठी केंद्र सरकारकडे जावे लागते परंतु आपल्याला मात्र केंद्र सरकारकडे जाण्याची काही गरज नाही. १६ जिल्ह्यात ४०० ते ५०० कोटी रुपये खर्च केले जातात ही गोष्ट सोपी नाही. तेव्हा तांत्रिक बाबींचा विचार करून सचिवांना आणि माननीय मंत्रिमहोदयांना या बाबतीत माहिती देण्यात यावी व तशा प्रकारचा प्रस्ताव पाठविण्यात यावा आणि कॅबिनेटच्या बैठकीत हा विषय लवकर कसा येईल या दृष्टीने सचिवांनी आणि माननीय मंत्रिमहोदयांनी प्रयत्न करावेत ११० कोटी रुपयांपैकी पी.एफ आणि इतर बाबीसह १० कोटी रुपये खर्च होतील. १०० कोटी रुपये जरी विभागाला मिळाले तरी त्यातून आपल्याला कामे करता येतील. **म्हणून समिती अशी शिफारस करते की अदिवासी विभागामार्फत त्यांच्या आस्थापनावरच त्वरित तांत्रिक अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे भरण्याबाबत कार्यवाही करून तांत्रिक अडचण दूर करावी व विभागाने स्वतःचीच यंत्रणा उभी करून स्वतःच कामे करावीत अशी समितीची शिफारस आहे.**

**७.** आदिवासी दऱ्याखोऱ्यात राहतात त्यांची राहण्याची सोय नाही. ते शिक्षणापासून वंचित राहतात. अशा स्थितीत आदिवासींचा निधी दुसरीकडे वळविला जातो. राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात हरसूल तालुक्यात अनेक आदिवासी पाड्यावर पाणी मिळत नाही ही बाब गंभीर आहे. आदिवासींना वीज, पाणी, शिक्षण आणि घरे मिळावीत यासाठी शासन कोट्यवधी रुपये निधी उपलब्ध करून देत असते. परंतु हा निधी खर्च करीत असताना अधिकाऱ्यांनी दक्ष राहिले पाहिजे. **त्याचप्रमाणे आदिवासी विकास विभागामध्ये राज्यात बऱ्याच ठिकाणी प्रकल्प अधिकारी/सहायक प्रकल्प अधिकारी, अपर आदिवासी आयुक्त अशा महत्त्वाच्या पदावर पूर्ण काळ अधिकाऱ्यांची नेमणूक झाली नसल्याने सदर पदे वर्षानुवर्षे रिक्त असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे आदिवासींसाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी योग्यरितीने होत नसल्यामुळे बराचसा निधी खर्च करावयाचा पडून राहतो. म्हणून राज्यातील सर्व आदिवासी विकास विभागातील रिक्त असलेली अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदे त्वरित भरण्याबाबत समिती आग्रहाची शिफारस करीत आहे.**

(८) समितीने सन २००९-२०१० या कालावधीत वसतीगृहासाठी झालेल्या निधीचे वाटप कोणी केले अशी विचारणा केली असता समितीस पुढीलप्रमाणे माहिती देण्यात आली. सन २००९-२०१० मध्ये २० कोटी ७८ लक्ष ५१ हजार एवढा निधी वसतीगृह बांधकामासाठी मिळाला आहे. ३४.४५ लक्ष रुपये निधी शासकीय आश्रमशाळा बांधकामासाठी मिळालेला आहे. हा सर्व निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जातो. याबाबत समितीस सार्वजनिक बांधकाम विभागाने पुढीलप्रमाणे माहिती सादर केली.

सार्वजनिक बांधकाम विभागास सुरूवातीला ५५१ लक्ष रुपये अनुदान मिळाले होते. कामाची मागणी फक्त ६० लक्ष रुपयांची होती. यासंदर्भात वर्षभर पत्रव्यवहार करण्यात आला. इतर कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात यावी, अशी आमची विनंती होती. जर मान्यता मिळाली असती तर त्याप्रमाणे एस्टिमेट करून खर्च करण्यात आला असता. परंतु, शेवटपर्यंत मंजुरी मिळाली नाही.

प्रशासकीय मंजुरी व अंदाजपत्रकास मान्यता देण्याबाबत अनेक वेळा सार्वजनिक बांधकाम विभागाने पत्रव्यवहार केलेला आहे याबाबत समितीने असे सूचित केले की, सार्वजनिक बांधकाम विभागाने पत्रव्यवहार करून देखील आरोग्य विभागाने दुर्लक्ष केल्याचे असे दिसून येते. सह सचिवांनी १/३ निधीचे वाटप केले, असे सांगितले आहे. अंतिम क्षणी निधीचे वाटप झाले, असे नाही. निधी सुरूवातीलाच म्हणजे १५ एप्रिलला मिळालेला आहे. मागील वर्षी विधानसभा निवडणुकीमुळे लेखानुदान मांडण्यात आले होते. आचारसंहितेच्या काळात लेखानुदान सादर करण्यात आले होते तरी देखील ५.५० कोटी रुपयांची तरतूद झालेली आहे. त्यानंतर नवीन विधानसभा गठीत झाली. त्यानंतर नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी, मार्च असे ५ महिने होते. त्या काळात जेवढी तरतूद करण्यात आली होती तेवढ्या कामांना मान्यता दिली असती तर निधी खर्च झाला असता. आरोग्य विभाग व आदिवासी विकास विभागाने मान्यता दिली नसेल, असे वाटते नेमका निधी कोणत्या विभागाला वितरित करण्यात आला होता याबाबत विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला. आदिवासी विकास विभागाने आदेश काढले होते. अंमलबजावणी यंत्रणा म्हणून अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे निधी प्राप्त झाला होता. निधी प्राप्त झाल्यानंतर नेमक्या कोणत्या कामासाठी निधी खर्च करावयाचा आहे, याबाबतचे आदेश काढणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभाग मॉनिटरिंग करू शकतो. ते झाले नाही. **याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली** म्हणून समितीने असे निदर्शनास आणले की ही बाब गंभीर आहे, ज्या कामांसाठी निधीची तरतूद करण्यात आलेली आहे, ती कामे संबंधित यंत्रणांकडून होत आहेत किंवा नाही, संबंधित कामाची अंदाजपत्रके तयार झाली आहेत किंवा नाही, या कामांना प्रशासकिय मान्यता मिळविण्याची कार्यवाही संबंधित यंत्रणांनी केली आहे किंवा नाही, याबाबतचा आढावा घेण्याची किंवा त्याबाबत पाठपुरावा करण्याची जबाबदारी संबंधित सहायक प्रकल्प अधिकारी यांची आहे. संबंधित सहायक प्रकल्प अधिकारी यांनी याबाबत कोणतीच कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. आदिवासी विकास आयुक्तालयाच्या या अधिकाऱ्यांनी पत्रव्यवहार केला असता तर यासंदर्भात तातडीने कार्यवाही झाली असती.

आदिवासी समाजाच्या विकासासाठी असलेल्या योजनांवरील निधी खर्च करण्याबाबत आदिवासी विकास आयुक्तालयाकडून पाठपुरावा झाला नाही. परंतु, आदिवासी विकास विभागाने जर ही माहिती समितीला दिली असती तर समितीने मंत्रालय पातळीवर प्रशासकीय मान्यता किंवा अंदाजपत्रकांना मान्यता

मिळवून देण्याबाबत प्रयत्न केले असते, आदिवासी विकासाच्या योजनांची अंमलबजावणी जरी शासनाच्या वेगवेगळ्या यंत्रणांमार्फत होत असली तरी या संपूर्ण योजनांचे, कामांचे सनियंत्रण करण्याचे काम आदिवासी विकास आयुक्तालायाकडे देण्यात आलेले आहे. प्रकल्प अधिकारी, सहायक आयुक्त यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा केला असता किंवा आयुक्त, आदिवासी विकास, सचिव, आदिवासी विकास विभाग यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिली असती तरी हे काम वेगाने झाले असते, अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही त्यांनी केलेली दिसून येत नाही. अशा निष्क्रीय अधिकाऱ्यामुळे आदिवासीसाठी येणारा निधी योग्य ठिकाणी योग्य वेळी खर्च होत नाही. **म्हणून समिती अशी शिफारस करते की, या प्रकरणाची उच्च पातळीवर चौकशी करून जे जे दोषी अधिकारी आढळून येतील त्यांच्यावर त्वरित कारवाई करून समितीस तीन महिन्यात या बाबतची माहिती कळविण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

(९) सन २००७-२००८ ते सन २००९-२०१० या वर्षात अप्पर आयुक्तनिहाय प्राप्त झालेली रक्कम व झालेला खर्च याबाबत माहिती देण्यात यावी. त्याचप्रमाणे, सन १९९५-१९९६ पासून राज्यात आदिवासी उपयोजना क्षेत्रातील १५ जिल्ह्यांत नवसंजीवन योजना राबविण्यात येत आहे. योजनेचा उद्देश आदिवासी व अतिदुर्गम भागात वर्षभर पुरेसा रोजगार उपलब्ध करून देणे, पाणीपुरवठा, स्वस्त धान्य दुकानामार्फत धान्यपुरवठा करणे, आरोग्याच्या सोयी उपलब्ध करून देणे, कुपोषण कमी करण्याच्या दृष्टीने पोषण आहारविषयक कार्यक्रम राबविणे, धान्य कोष योजना व खावटी कर्ज योजनांमार्फत कोणकोणत्या जिल्ह्यात पुरवठा करण्यात आला आहे, या संदर्भात गेल्या तीन वर्षात किती पैसा उपलब्ध करून देण्यात आला व कोणकोणत्या कामांवर पैसा खर्च झाला याची प्रकल्पनिहाय माहिती देखील समितीस **समाधान कारक मिळू शकली नाही. याबाबत समितीने खेद व्यक्त केला आहे. म्हणून समिती अशी शिफारस करते की, आदिवासांच्या कल्याणासाठी येणारा निधी योग्य रितीने व वेळेत वाटप करून आदिवासींचे जिवनमान उंचावून त्यांची प्रगती होण्यासाठी वेळेत योजनानिहाय खर्च करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात याव्यात. त्याचप्रमाणे ज्या, अधिकाऱ्याने हेतुपुरस्सर वेळ काढूपणा केला किंवा अन्य ठिकाणी पैसा खर्च केल्यास अशा अधिकाऱ्यांवर त्वरित कारवाई करण्यात यावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

(१०) समितीने ठक्कर बाप्पा आदवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रम योजनेबाबत माहिती विचारली असता पुढील प्रमाणे लेखी माहिती देण्यात आली. या योजनेबाबत सामितीस पुढीलप्रमाणे माहिती देण्यात आली. राज्यातील आदिवासी क्षेत्राच्या सर्वांगीन विकासासाठी सामाजिक न्याय विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या दलित वस्ती कार्यक्रमाच्या धर्तीवर शासनाने ' **ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रम** ' या योजनेला मंजुरी दिली आहे. आदिवासींच्या कौटुंबिक, सामुहिक व

वैयक्तिक विकासासाठी आदिवासी उपयोजना राबविली जाते. या आदिवासी उपयोजनेंतर्गत अधिसुचित आदिवासी क्षेत्र, माडा क्षेत्र व मिनीमाडा क्षेत्राच्या मुलभूत विकासाकरिता विविध प्रशासकिय विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या अनेक योजनांसाठी निधी देण्यात येतो. आदिवासी उपयोजनेमध्ये अधिसूचित आदिवासी क्षेत्र, अतिरीक्त आदिवासी उपयोजना क्षेत्र तसेच माडा/मिनीमाडा क्षेत्र यामधील, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्र यामधील गावांना आदिवासी उपयोजनेच्या निधीमधुन पायाभुत सुविधा निर्माण करण्यासाठी तरतुदी उपलब्ध करून देण्यात येतात. तथापि, अदिवासी उपायोजना क्षेत्रतील भागामध्ये ज्या ठिकाणी मोठ्या संख्येने आदिवासींचे वास्तव्य आहे. तेथे शासनाच्या सध्याच्या धोरणानुसार पायाभुत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आदिवासी उपयोजनेच्या निधीमधुन तरतुद उपलब्ध करून देण्यास प्रतिबंध आहे. यामुळे अशा भागांचा विकास इतर भागांच्या तुलनेत कमी प्रमाणात होत आहे किंवा अशा वस्त्या दुर्लक्षित राहिलेल्या आहेत, असे दिसुन येते, सध्या अधिसुचित क्षेत्रांचा व तेथे राहणाऱ्या आदिवासींचा विकास होण्यास पुरेसा वाव आहे. तथापि, आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्रामधील (ओटीएसपी) छोट्या-छोट्या आदिवासी वस्त्या तसेच ज्या वस्त्यांमध्ये/गावांमध्ये ५० टक्क्यांच्या आसपास आदिवासी लोकसंख्या आहे, परंतु त्यांचा अद्यापी मिनीमाडा/माडा पॉकेटमध्ये समावेश झालेला नाही, अशी आदिवासी गावे, वस्त्या व लोकसमुहांच्या विकासाकडे प्रामुख्याने द्यावे तेवढे लक्ष देता आले नाही परिणामी त्यांच्या विकासाकडे सातत्याने दुर्लक्ष केले जात असल्याची भावना तेथील आदिवासी समाजात पसरलेली आहे. अशा काही गावांचा सर्व्हे करून मिनीमाडा व माडा पॉकेट्स निर्माण करण्याकरिता राज्य शासनाने प्रस्ताव तयार करून ते केंद्र शासनाकडे मंजुरीकरीता पाठविलेले आहेत. तथापि, त्यांना केंद्र शासनाची अद्याप मान्यता मिळाली नाही. अशा आदिवासी वस्त्यांच्या सुधारणेचा कार्यक्रम या योजनेखाली राबविण्याचे प्रस्तवित करण्यात येत आहे. त्यानंतर टप्याटप्याने ओटिएसपी मधील अन्य आदिवासी वस्त्यांमध्ये ही योजना राबविली जाणार आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील १५ जिल्ह्यातील ६२ प्रस्तावित माडा/मिनीमाडा पॉकेट मध्ये सदर योजना राबविण्यात येणार आहेत.

सन २००४-०५ या वर्षात सदरच्या योजनेवर रु.४२४.१८ लक्ष एवढा खर्च झाला असुन १०४ गावांसाठी १४७ घटक योजनांतर्गत लाभ देण्यात आला असुन ११९ घटक पुर्ण झाल्या आहेत अशी समितीस लेखी माहिती देण्यात आली.

समितीने नाशिक जिल्ह्यामध्ये व राज्यातील काही ठिकाणी या ठक्कर बाप्पा योजनेस भेटी दिल्या आहेत. सदर भेटीच्या वेळी समितीने काही ठक्कर बाप्पा घरकुल योजनेची माहिती घेऊन पाहणी केली परंतु ओटीएसपी क्षेत्रातील लोकांना सदर योजनेचा फारच कमी प्रमाणात लाभ मिळत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे या बाबत समितीच्या साक्षीच्या वेळी विचारले असता विभागीय

प्रतिनिधींनी असे सांगितले की, आत्ता ओटीएसपी क्षेत्रासाठीदेखील ही योजना लागु केलेली आहे. त्यानुसार ज्या ठिकाणी १० टक्के, १५ टक्के आदिवासी लोक राहतात त्या ठिकाणी देखील पैसा खर्च झालेला असल्याचे सांगण्यात आले.

ठक्कर बाप्पा योजनेच्या माध्यमातून जो पैसा खर्च झालेला आहे तो चुकीच्या पद्धतीने झालेला असल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले आहे. समितीने यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवढा प्रकल्प क्षेत्रामध्ये आदिवासींच्या वस्तीकडे जाण्यासाठी रस्ता करण्याऐवजी एका लोकप्रतिनिधीच्या खाजगी महाविद्यालयापर्यंत या योजनेतून काम केल्याचे निष्पण झाले आहे व रस्त्यावर आदिवासी योजनेच्या निधी खर्च केलेला आहे. अशा अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याऐवजी संबंधित अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न संबंधित अधिकारी करीत आहेत. अशा कृत्याबद्दल समिती तिव्र नापसंती व्यक्त करते. **अशा रितीने आदिवासी जनतेचा निधी अन्य विभागाने खर्च करून वाया जाण्यापेक्षा ओ.टी.एस.पी. क्षेत्रातील आदिवासी लोकांना जास्तीत जास्त घरकुल योजनांच्या माध्यमातून निवारा उपलब्ध करून देण्यात यावा. त्याच प्रमाणे जे अधिकारी आदिवासींच्या योजनांवर योग्य तो खर्च करीत नसून चुकीच्या पद्धतीने खर्च करतात. अशा अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी. अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

**(११)** समितीने काही प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेटी दिल्या त्यावेळी समितीच्या असे लक्षात आले की, प्राथमिक आरोग्य केंद्रातील आदिवासी आंतररुग्णांना जेवण दिले जात नाही. काही प्राथमिक आरोग्य केंद्रात मात्र रुग्णांस व रुग्णांच्या एका नातेवाईकास जेवण दिले जाते. एकाच जिल्ह्यात एका यंत्रणेमार्फत अशा पद्धतीने वेगळवेगळी कार्यपद्धती राबविली जात आहे. वास्तविक पाहता एन.एच.यू.आर.एम.च्या निधीतून आदिवासी किंवा दारिद्र्यरेषेखालील रुग्णास व एका नातेवाईकास जेवण देण्यासाठी लागणारा खर्च संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत करु शकतात. परंतु अशा प्रकारचा प्रयत्न काही प्राथमिक आरोग्य केंद्रांनी केलेला नाही, ही अतिशय गंभीर बाब आहे. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी जिल्ह्यात यासंदर्भात एक कार्यपद्धती अवलंबिण्याबाबत सूचना दिल्या पाहिजे. जिल्हा आरोग्य अधिकारी ज्या वेळी प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेटी देतात त्यावेळी ही बाब त्यांच्या लक्षात येणे गरजेचे होते. परंतू तसे झाल्याचे समितीस आढळून आले नाही.

समितीने दिंडोरी ग्रामीण रुग्णालयाला भेट दिली त्यावेळी असेही लक्षात आले की, त्या आरोग्य केंद्रांमधील रुग्णांना बाहेरुन औषधे, इंजेक्शन मागविण्यास सांगण्यात आले होते. समितीने रुग्णालयात आंतररुग्ण म्हणून दाखल असलेल्या रुग्ण श्रीमती आम्रपाली शांताराम सोनावणे व इतर रुग्णांकडे चौकशी केली असता त्या रुग्णांनी इंजेक्शन बाहेरुन खरेदी केल्याचे समितीला सांगितले. दारिद्र्य

रेषेखालील रुग्णांना, आदिवासी रुग्णांना बाहेरुन औषधे, इंजेक्शन आणण्यास सांगू नये, अशा प्रकारच्या स्पष्ट सूचना असतांना काही प्राथमिक आरोग्य केंद्रात चुकीच्या पद्धतीने कारभार सुरू आहे. याचीही गंभीर दखल जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी घेणे गरजेचे आहे व त्यादृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करणे आवश्यक आहे.

दिंडोरी ग्रामीण रुग्णालयाला भेट दिली त्यावेळी डॉ.पाटील रुग्णालयात उपस्थित नव्हते. चौकशी केली असता असे समजले की, कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल सिव्हिल सर्जन यांना देण्यासाठी ते स्वत: नाशिक येथे गेले असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. रुग्णालयाची जबाबदारी त्यांच्यावर असताना व लिपिक किंवा शिपायामार्फत गोपनीय अहवाल पाठविणे शक्य असताना देखील त्यांनी नाशिक येथे जाण्याची काहीही आवश्यकता नव्हती. समितीने ज्यावेळी हजेरी नोंदवहीची तपासणी केली त्यावेळी असे लक्षात आले की, २३ एप्रिल २०१० पासून डॉ.पाटील यांनी हजेरी नोंदवहीत स्वाक्षरी देखील केलेली नव्हती. त्याचप्रमाणे स्टाफ नर्स श्रीमती शेख व शिपाई यांच्यादेखील हजेरी नोंदवहीत स्वाक्षऱ्या नव्हत्या. अशा प्रकारे जर रुग्णालय प्रमुख स्वत: रुग्णालयात गैरहजर रहात असतील तर रुग्णालयातील इतर कर्मचाऱ्यांना शिस्त कशी लागणार आहे ? त्यामुळे संबंधित डॉक्टर, स्टाफ नर्स, शिपाई यांच्या गैरहजेरीबाबत चौकशी करण्यात यावी व आवश्यक ती कारवाई करण्यासाठी अशा घटनांची इतर ठिकाणी पुनरावृत्ती होणार नाही. याबाबत सर्व संबंधित अधिकाऱ्यांना पुन्हा एकदा स्पष्ट लेखी सूचना देण्यात याव्यात.

अंबोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रालाही समितीने भेट दिली. त्या ठिकाणी शासनाने पुरविलेला जनरेटर वापरात नाही. काही प्राथमिक आरोग्य केंद्रात जनरेटर वापरला जातो. फॉगिन मशिन देखील वापरत नाही. या आरोग्य केंद्राला जो पाणी स्वच्छ करण्यासाठी ॲक्वागार्ड दिलेला आहे तो स्टाफ रूममध्ये बसविण्यात आलेला आहे. वास्तविक पाहता रुग्ण, रुग्णांचे नातेवाईक, स्टाफ या सर्वांना ॲक्वागार्ड वापरता येईल व सर्वांनाच स्वच्छ पाणी उपलब्ध होईल, या उद्देशाने सर्वांना सोयिस्कर होईल अशा ठिकाणी ॲक्वागार्ड बसविणे आवश्यक होते. तथापि, डॉक्टर व स्टाफने स्वत:ची सोय बघितली आहे व रुग्णांच्या बाबतीत काळजी घेतलेली नाही.

**(१२)** या आरोग्य केंद्रातील काही कर्मचाऱ्यांनी हजेरी नोंदवहित स्वाक्षरी केल्याचे आढळून आले नाही. बहुतेक प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांना व कर्मचाऱ्यांना हजेरी नोंदवहित स्वाक्षरी करण्याची सवय नाही. रजा अर्जावर शेरा न मारता तसाच ठेवलेला असतो. यासंदर्भातही कडक उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

दिंडोरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सकाळी ८-०० ते सायंकाळी ५-०० व रात्री ९-०० ते सकाळी ८-०० या कालावधीत वॉचमन ठेवलेला आहे. परंतु, सायंकाळी ५-०० ते ९-०० या कालावधीत वॉचमन नसतो. प्राथमिक आरोग्य केंद्रातील शिपाईच वॉचमनचे काम करतात. असे समितीस सांगण्यात आले. **याबाबत**

**समितीने तीव्र नापसंती व्यक्ती केली. याबाबत समिती या निर्ष्कषापर्यंत आली आहे की, वरील घटनेस जे-जे संबंधित अधिकारी जबाबदार असतील त्यांच्यावर कठोर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी. त्याचप्रमाणे संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी यांचा देखील निष्काळजीपणा दिसून येतो. म्हणून समिती अशी शिफारस करते की, राज्यात ज्या-ज्या ठिकाणी आदिवासी उपाययोजना क्षेत्रामध्ये असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये अशा घटना घडू नयेत व आदिवासी रुग्णांना खऱ्या अर्थाने न्याय मिळण्यासाठी त्यांना योग्य व आवश्यक असलेल्या औषधे व इंजेक्शन्सचा पुरवठा होतो किंवा नाही ही जबाबदारी जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्यावर सोपवून संबंधित आरोग्य अधिकाऱ्यांकडून अहवाल मागवून घेण्यात यावा तसेच ज्या ठिकाणी कर्मचारी वर्ग अपुरा असेल तेथे त्वरित आवश्यक त्या कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात यावी. संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांनी ज्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. त्याच ठिकाणी राहणे आवश्यक असल्याचे पुन्हा शासन निर्णय/पत्रक निर्गमित करण्यात यावे. त्याचप्रमाणे आदिवासी भागात असणाऱ्या सर्वच शासकीय रुग्णालयामध्ये काम करणाऱ्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना नियमित उपस्थित राहण्याच्या दृष्टीने बायोमॅट्रिक पद्धत त्वरित सुरू करण्यात यावी. ही समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

**(१३)** राज्यातील बऱ्याच ठिकाणी अनुसूचित जमाती कल्याण समितीने आदिवासींच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या आश्रमशाळांना भेटी दिल्या, राज्यातील कोणत्याच आश्रमशाळांची स्थिती समाधान कारक नसल्याचे समितीस आढळून आले आहे. समितीच्या बैठकीच्या वेळी आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांना राज्यातील आश्रमशाळा विषयी माहिती विचारल्यानंतर त्यांनी समितीस असे सांगितले की, राज्यात ५५१ शासकीय आश्रमशाळा असून त्यातील विद्यार्थ्यांची संख्या २ लाख ७ हजार एवढी आहे. त्याचप्रमाणे ५५६ अनुदानीत आश्रमशाळा असून त्यामधील विद्यार्थी संख्या २ लाख २५ हजार एवढी आहे.

समितीने राज्यातील काही निवडक आश्रमशाळांना भेटी दिल्या होत्या. त्यावेळी समितीस असे आढळून आले की, **अकोला येथील आश्रमशाळांच्या रेकॉर्डवरील विद्यार्थी संख्या व प्रत्यक्षात असलेली आश्रम शाळेतील विद्यार्थी संख्या यामध्ये फार मोठी तफावत होती. अकोला येथील सदर आश्रमशाळेची पटसंख्या बोगस असल्यामुळे सदर आश्रमशाळा रद्द करावी, असे शेरे देखील मारण्यात आले होते. याबाबत समितीने संबंधित अप्पर आयुक्तांना देखील सांगितले होते. परंतु समितीने असे शेरे दिल्यानंतर देखील संबंधित अधिकाऱ्यांनी त्या आश्रमशाळेत १४ लाखांचे अनुदान देण्यात आले. अशा संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या वर्तनाबाबत समिती साशंक असून सदर शाळेची त्वरित मान्यता रद्द करावी व त्या आश्रमशाळेत गैरकारभार सुरू असून देखील अनुदान मंजूर करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करून याबाबतचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत देण्यात यावा, अशी समिती आग्रहाची शिफारस करीत आहे.**

(१४) समितीने राज्यातील बऱ्याच शासकीय व अनुदानीत आश्रमशाळांना भेटी दिल्या. सदर भेटीच्या वेळी समितीस आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची गैरहजेरी तेथील शिक्षकांकडून विद्यार्थ्यांची पूर्ण उपस्थिती दाखवून शासनाच्या पैशाची लूट करणे, विद्यार्थी व विद्यार्थीनींना आंघोळीसाठी स्नानघर नसणे, काही आश्रमशाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय नसणे, त्यांना झोपण्यासाठी आंथरुण नसणे, जेवणाची चांगली व्यवस्था नसणे, निकृष्ठ दर्जाचे जेवण देणे, रात्री अभ्यासासाठी दिवाबत्तींची चांगली व्यवस्था नसणे, विद्यार्थ्यांना प्रयोगशाळा नसणे त्याच प्रमाणे बऱ्याच आश्रमशाळामध्ये शिकवण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक वर्ग नसल्याचे देखील आढळून आले आहे. या आश्रमशाळांच्या एकूण कारभारावरच समिती नाराज असून राज्यातील अनुदानीत व शासकीय आश्रमशाळांच्या व्यवस्थेबाबत व त्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर समिती तीव्र नापसंती व्यक्त करते.

आदिवासी विभागाच्या संबंधित अप्पर आयुक्त, प्रकल्प अधिकारी, सहाय्यक प्रकल्प अधिकारी व संबंधित कर्मचारी यांचे हेतुपूरस्सर असलेले दुर्लक्ष बरेच अधिकारी शासकीय/अनुदानीत आश्रमशाळांना भेट देत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. **म्हणून समिती अशी शिफारस करते की, वरील अधिकारी/कर्मचारी यांच्या भेटीच्या व्यतिरिक्त विभागीय पातळीवर एक भरारी पथकांची नेमणूक करून अचानक त्या-त्या विभागातील आश्रमशाळांना भेट देऊन त्याचा अहवाल आयुक्तामार्फत प्रधान सचिव, आदिवासी विकास विभागांना पाठविण्यात यावा व ज्या आश्रमशाळामध्ये विद्यार्थ्यांची कमी उपस्थिती असेल किंवा आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना पुरेशा सोयी उपलब्ध करून दिल्या नसतील किंवा आश्रमशाळा नाहक शासनाच्या पैशाचा गैरउपयोग करीत असतील अशा आश्रमशाळां अनुदान बंद करून त्वरित त्यांची मान्यता रद्द करावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

समितीने राज्यातील अनेक आश्रमशाळांना भेटी दिल्या असता समितीस असेही आढळून आले की, बऱ्याच आश्रमशाळेतील शिक्षक वेळेवर शाळेत येत नाहीत किंवा शाळेमध्ये अनेक शिक्षक दारु पिऊन येतात. चांगली पिढी घडविणे हे शिक्षकांचे कर्तव्य आहे.

(१५) आदिवासी मुलांना प्रगतीच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना उच्च शिक्षित करण्याचा शासनाचा प्रामाणिक प्रयत्न आहे. परंतु शाळेमध्ये दारु पिऊन शिक्षक येत असतील तर अशा निष्पाप मुलांच्या बालमनावर अशा शिक्षकांचा विपरित परिणाम देखील होऊ शिकतो. दारु पिऊन येणारा शिक्षक विद्यार्थ्यांना व्यवस्थित शिकवणार नाही तो सतत गैरहजर असतो. **अशा शिक्षकांबाबत लोकप्रतिनिधींनी तक्रार करून देखील संबंधित शिक्षकांवर काहीच कारवाई झाली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. म्हणून समिती अशी शिफारस करते की, व्यसनी शिक्षकांच्या किंवा सतत गैरहजर राहणाऱ्या शिक्षकांवर कडक कारवाई करून त्यांची अन्य अप्पर आदिवासी आयुक्ताच्या कार्यक्षेत्रामध्ये बदली करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**(१६)** समितीने दिलेल्या भेटीच्यावेळी समितीस असे आढळून आले की, बऱ्याच शासकीय व अनुदानीत आश्रमशाळेतील मुलींसाठी स्नानगृहे व स्वच्छतागृहे नाही. काही आश्रमशाळामध्ये मुलींसाठी स्नानगृह असले तरी त्यांना दरवाजे नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. त्याचप्रमाणे स्वच्छतागृहांना देखील दरवाजे नसतात. काही ठिकाणी आश्रमशाळांतील मुलींना विहिरीवर किंवा उघड्यावर आंघोळ करावी लागते. ही मोठी खेदाची बाब आहे. **म्हणून समिती अशी शिफारस करते की, आदिवासी विकास विभागाने राज्यातील सर्व आश्रमशाळा तपासणीसाठी एक स्वतंत्र समिती स्थापन करावी. ज्या ज्या आश्रमशाळांमध्ये मुलींसाठी स्वच्छतागृहे व स्नानगृहे बाबतच्या गैरसोयी असतील अशा आश्रमशाळेंवर त्वरित कारवाई करावी. आणि अशा आश्रमशाळेचे अनुदान बंद करावे तसेच शासकीय मुलींच्या आश्रमशाळेमध्ये ही सुविधा पुरविण्यासाठी एक रकमी रक्कम देऊन सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

(१७) आदिवासी आश्रमशाळेत ज्या ठिकाणी मुली राहतात. त्या ठिकाणी सभोवताली संरक्षण भिंती नाहीत. राज्यातील बऱ्याच आदिवासी आश्रमशाळांमधील मुलींवर बलात्कार होतात. एवढेच नव्हे तर इयत्ता ३ री व ४ थीमध्ये शिकणाऱ्या मुलींवर बलात्कार झाल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. अशा घटनांना त्या शाळेतील शिक्षक, शिपाई व मुख्याध्यापक प्रामुख्यांने जबाबदार असतात. त्यांच्या संगनमतानेच असे प्रकार घडत असतात, परंतु संबंधित आरोपींना संस्थाचालक पाठीशी घालतात असे प्रकार घडल्याचे निदर्शनास आल्यानंतर संबंधित व्यक्तीस त्वरित निलंबित करणे आवश्यक आहे. परंतु आदिवासींच्या दारिद्र्याचा आणि अज्ञानाचा फायदा घेऊन अशा मुलींवर आणि पालकांवर दबाव आणून सदर प्रकार दडपण्याचा प्रयत्न करतात. **म्हणून समिती अशी शिफारस करते की, एखाद्या शाळेतील एखाद्या मुलींवर बलात्कार झाल्यानंतर ती शाळा बदनाम होत असते. तेव्हा असा प्रकार घडल्यास संबंधित कर्मचाऱ्याला व अधिकाऱ्याला निलंबित करण्याचे अधिकार संबंधित प्रकल्प अधिकारी यांना दिले पाहिजेत तसेच बडतर्फ करण्याचे अधिकार आयुक्तांना दिले पाहिजेत संबंधित आरोपींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

**त्याचप्रमाणे एखाद्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे अधिकार जरी संस्थेकडे असले तरी अनुदान देण्याचे अधिकार आदिवासी विकास आयुक्तालयाकडे आहेत. जर एखाद्या संस्थेतील कर्मचाऱ्याने त्या शाळेतील मुलींवर बलात्कार केला असेल तर त्या संस्थेने संबंधित कर्मचाऱ्यास निलंबित केले नसेल तर जोपर्यंत दोषी कर्मचाऱ्यावर संस्था कारवाई करीत नाही तोपर्यंत पुढील अनुदान बंद करण्याचा निर्णय आयुक्तांनी त्वरित घ्यावा, अशीही समिती शिफारस करीत आहे.**

आदिवासी शेतकऱ्यांना विद्युत पंप व तेलपंप पुरविण्यात येतात. किमान ६० आर (१.५० एकर) आणि कमाल ६ हेक्टर (१६ एकर) एवढी शेतजमीन असणारे आदिवासी शेतकरी या योजनेचा लाभ घेण्यास पात्र असतात. तथापि, या योजनेखाली पात्र होण्याकरिता वर्षातील किमान सहा महिने एकतर विहीरीतून किंवा इतर साधनामार्फत त्यांच्या जमिनीसाठी पाण्याचे पुरेसे प्रमाण असले पाहिजे. तसेच विद्युत पंप मिळण्यासाठी त्यांच्या शेताच्या बाजूने विद्युत लाईन गेली असली पाहिजे. ज्यांच्याकडे विजेची सुविधा नाही असे शेतकरी तेलपंपाचा लाभ घेऊ शकतात. विहित जमिनीच्या क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्र धारण करणारे दोन किंवा तीन शेतकरी देखील या योजनेचा संयुक्तपणे लाभ घेऊ शकतात.

समितीने नाशिक येथे भेट देऊन तेथील आदिवासी पाडे व काही गावांना भेटी दिल्या त्यावेळी समितीस असे आढळून आले की सदर आदिवासी पाड्यांना व गावांना अद्यापी वीज पुरवठा करण्यात आला नाही. त्यामुळे तेथील आदिवासी जनतेची प्रगतिच खुंटलेली आहे. सदर गावांना विद्युत पुरवठा नसल्यामुळे त्यांच्या शेतावरील विहिरींना विद्युत पंप बसविता येत नाही. विहिरीवर विद्युत पंप नसल्याने शेतामधील उत्पादनामध्ये वाढ होऊ शकत नाही. शेतामधील उत्पादनामध्ये वाढ झाली नाही तर त्यांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा होणार नाही.

(१८) राज्यातील अनेक आदिवासी पाडे आणि गावांमध्ये अद्यापही विद्युत पुरवठा झालेला नाही. ज्या ठिकाणी विद्युत पुरवठा झाला नाही. **त्या ठिकाणाच्या आदिवासी जनतेची प्रगती झाली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळेच आदिवासी जनता दारिद्र्यरेषेखालील जीवन जगणारी आहे. दारिद्र्यरेषेखाली जगणाऱ्या जनतेस त्यांचे राहणीमान वाढविण्याच्या दृष्टिने अर्धा एकर ते १६ एकर पर्यंत शेत असलेल्या आदिवासी शेतकऱ्यांना केंद्र शासनाची महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना व एमआरईजीएस योजना या योजनामंधून पंचायत समित्यांनी, मागेल त्या आदिवासींना विहिरी खोदून देण्यात यावे. तसेच आदिवासींना सिंचन सुविधा पुरवाव्यात. जमिनीचे सपाटीकरण, बांध बंदिस्ती करून फळबाग लागवड करून देणे इ. कामे प्रभावीपणे करण्यात यावी, अशी समिती आग्रहाने शिफारस करीत आहे.**

**(१९) आदिवासींचे जीवनमान उंचाविण्यासाठी महावितरण व आदिवासी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मोटार व कनेक्शनची योजना सुरू करावी. पूर्वी आदिवासी विकास विभागामार्फत ही योजना राबविली जात होती. त्याऐवजी ए-१ फॉर्म म्हणजेच वीज मागणीचा अर्ज, महावितरणचे उप विभागीय अधिकारी यांच्याकडे परस्पर सादर करावा. अर्ज सादर करताना अर्धा एकर ते सोळा एकर जमीन आदिवासीकडे असल्याचा सात-बाराचा उतारा व ८ अ चा उतारा तसेच जात प्रमाणपत्र सादर केल्यास आदिवासींना ताबडतोब वीज कनेक्शन देण्याचे धोरण शासनाने राबववावे, अशी समिती आग्रहाची शिफारस करीत आहे.**

(२०) त्याचप्रमाणे समितीने नाशिक येथे भेट दिली त्यावेळेत समितीस असे आढळून आले की नाशिक जिल्ह्यामधील ७२ आदिवासी पाड्यांना अद्याप विद्युत पुरवठा झाला नाही. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना साक्षीच्या वेळी विचारले असता इस्टीमेट तयार केलेले आहे. एकूण ७२ आदिवासी पाड्यांना विद्युत पुरवठ्यासाठी रु.५.२५ कोटी रुपयाचे इस्टीमेट तयार असून निधी मिळाल्यास हे काम त्वरित हाती घेता येईल **म्हणून समिती अशी शिफारस करते की, नाशिक जिल्ह्यातील ७२ आदिवासी पाड्यांना विद्युत पुरवठा करण्यासाठी रु. ५.२५ कोटी रुपयाचे इस्टीमेट त्वरित विद्युत महावितरण कंपनीने आदिवासी विकास विभागाकडे पाठवावे. सदर रकमेत त्वरित मंजुरी देऊन निधी उपलब्ध करावा, अशी समितीची शिफारस आहे.**

(२१) महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाच्या मदतीने महाराष्ट्रात इंग्रजी माध्यमाच्या एकूण ४ एकलव्य इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळा आंध्र प्रदेश सरकारने स्थापन केलेल्या शाळांच्या धर्तीवर आदिवासी विद्यार्थ्यांसाठी एकलव्य इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळा १. कांबळगांव, ता. पालघर, जि. ठाणे २. मुंढेगांव, ता. इगतपुरी, जि.नाशिक ३. चिखलदरा, ता. चिखलदरा, जि. अमरावती व ४. खैरीपरसोडा ता. रामटेक, जि. नागपूर येथे उघडलेल्या आहेत. केंद्र शासनाने अशा नऊ शाळा मंजूर केल्या असून त्यापैकी वरिल चार शाळा २०००-२००१ मध्ये पाचव्या वर्गापासून सुरू करण्यात आलेल्या आहेत.

सदर शाळा स्थापन करण्याचा मूळ उद्देश आदिवासी विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण देणे हा आहे. त्याकरीता शिक्षण विभागाकडील त्याचप्रमाणे आदिवासी विकास विभागाकडील उत्तम दर्जाच्या शिक्षण वर्गाची चांगल्या पगारावर नियुक्ती करण्यात आलेली आहे. या शाळांचे व्यवस्थापन महाराष्ट्र आदिवासी शाळा संस्थांकडून ज्याचे अध्यक्ष, प्रधान सचिव, आदिवासी विकास आणि सदस्य-सचिव, आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचेकडून करण्यात येते.

**आदिवासी मुलांमध्ये खरा बदल घडवून त्यांना उच्च शिक्षित करून त्यांना जगामध्ये इतर मुलांशी शैक्षणिक स्पर्धा करण्यासाठी आदिवासी विभागांने राज्यात आदिवासी विभागाव्यतिरिक्त देखील अन्य ठिकाणी देखील इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळा सुरू करणे आवश्यक आहे. म्हणून समिती अशी शिफारस करते की, आदिवासी उपाययोजनेबाहेर असलेल्या बीड जिल्ह्यामध्ये इंग्रजी माध्यमाच्या शाळेस त्वरित मान्यता देऊन नवीन निवासी इंग्रजी शाळा सुरू करण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

## अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत

(२२) अनुसूचित जमातीच्या यादीतील काही जमातींच्या नामसदृष्याचा फायदा घेऊन बिगर आदिवासी त्या जमातींचे प्रमाणपत्र मिळवितात ही बाब शासनाच्या निदर्शनास आली. त्यास पायबंद घालण्यासाठी दिनांक २९ ऑक्टोबर १९८० च्या शासन निर्णयान्वये जातीचे प्रमाणपत्र निर्गमित करण्याची पद्धत विहित करण्यात आली. त्यामध्ये जातीचे प्रमाणपत्र निर्गमित करताना कोणत्या बाबी पाहाव्या याबाबत सक्षम अधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या होत्या.

सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक १४७६७/१९९३ संदर्भातील सिव्हील अपील क्रमांक ५८५४/१९९४ (कुमारी माधुरी पाटील विरुद्ध अपर आयुक्त, आदिवासी विकास व इतर) वर दिनांक २ सप्टेंबर १९९४ रोजी निर्णय दिला. या निर्णयातील निदेशानुसार दि.२९ ऑक्टोबर १९८० चा शासन निर्णय अधिक्रमित करून दिनांक ७ मार्च १९७६ चा शासन निर्णय निर्गमित केला. या शासन निर्णयातही जातीचे प्रमाणपत्र निर्गमित करताना कोणत्या बाबी पाहाव्या याबाबत सक्षम अधिकाऱ्यांना सूचना दिल्या होत्या.

शासनाने, ‘ महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २०००, दिनांक १८ ऑक्टोबर २००१ पासून लागू केलेला आहे. या अधिनियमांतर्गत, ‘ महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ ’ दिनांक ५ जून २००३ पासून लागू झालेले आहेत. या नियमांमध्ये अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्रे निर्गमित करण्याची विहित पद्धत नमूद करण्यात आलेली आहे.

थोडक्यात प्रथम दिनांक २९ऑक्टोबर १९८० व दिनांक ७ मार्च १९९६ च्या शासन निर्णयानुसार जातीची प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात येत होती. आता महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ यानुसार अनुसूचित जमातीची प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात येतात.

अनुसूचित जमातीच्या नामसादृष्याचा फायदा घेऊन बिगर आदिवासींनी जमातीची प्रमाणपत्रे घेतलेले आहे ही बाब शासनाच्या निदर्शनास आली. त्या प्रमाणपत्रांच्या आधारे बिगर आदिवासींनी अनुसूचित जमातींसाठी राखीव असलेल्या जागांवर प्रवेश / नियुक्ती मिळवून खऱ्या अनुसूचित जमातींच्या व्यक्तींना त्यांच्या हक्कापासून वंचित करु नये ही बाब विचारात घेऊन शासनाने सन १९८१ मध्ये संचालक, समाजकल्याण, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली जाती / जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती नेमली. तद्नंतर सन १९८५ मध्ये फक्त अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राची तपासणी करण्यासाठी संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती नेमली. सद्यःस्थितीत ठाणे, नाशिक, नंदुरबार, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, गडचिरोली येथे अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्या कार्यरत आहेत.

दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक १४७६७/१९९३ संदर्भातील सिव्हील अपील क्रमांक ५८५४/१९९४ (कुमारी माधुरी पाटील विरुद्ध अपर आयुक्त, आदिवासी विकास व इतर) वर दिनांक २ सप्टेंबर १९९४ रोजी निर्णय दिला. या निर्णयातील निदेशानुसार अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांची पुढीलप्रमाणे पुनर्रचना करण्यात आली :—

| | | |
|---|---|---|
| (१) | आयुक्त / संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे | अध्यक्ष |
| (२) | सहआयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती | उपाध्यक्ष |
| (३) | उप संचालक (संशोधन) | सदस्य-सचिव |
| (४) | वरीष्ठ संशोधन अधिकारी | सदस्य |
| (५) | संशोधन अधिकारी | सदस्य |

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या वरील निर्णयातील विहित पद्धतीनुसार प्रमाणपत्र तपासणी समित्या अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राची तपासणी करीत होत्या.

शासनाने, 'महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (२००१ चा महा. क्र.२३)' दि. १८ ऑक्टोबर२००१ पासून लागू केलेला आहे. यानुसार अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्या दिनांक ५ जून २००३ च्या शासन अधिनियमांतर्गत 'महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ ' दिनांक ५ जून २००३ पासून लागू झालेले आहेत. या नियमांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने कुमारी माधुरी पाटील प्रकरणी दिलेल्या निर्णयातील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणीची विहित पद्धत अंतर्भूत केलेली आहे. त्यानुसार अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्या जमातीच्या प्रमाणपत्रांची तपासणी करतात.

अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये एकूण ४७ मुख्य जमाती व त्याच्या उप/तत्सम जमाती आहेत. पुढारलेल्या (बिगर आदिवासी) समाजातील काही नावे अनुसूचित जमातीतील काही नावासारखी आहेत. त्यामुळे पुढारलेल्या समाजातील लोक नामसादृश्याचा फायदा घेतात. या प्रवृत्तीस आळा बसावा म्हणून आदिवासींची लक्षणे, भौगोलिक स्थिती, संस्कृती, देवदेवता, आप्तसंबंध, कुळपद्धती, वंशिकता इत्यादि बाबी विचारात घेऊन विहित पद्धतीने अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्रांची तपासणी व्हावी म्हणून शासनाने सन १९८५ मध्ये प्रथम स्वतंत्र यंत्रणा म्हणजे तपासणी समिती निर्माण केली.

**अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती व दक्षता पथक यांची रचना–**

ठाणे, पुणे, नाशिक,.औरंगाबाद, अमरावती व नागपूर येथे प्रत्येकी एक तपासणी समिती कार्यरत असून प्रमाणपत्र तपासणी समिती व दक्षता पथक यांची रचना पुढीलप्रमाणे आहे :—

**प्रमाणपत्र तपासणी समिती :—**(१) संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, अध्यक्ष, (२) अपर आयुक्त, आदिवासी विकास, उपाध्यक्ष, (३) उप संचालक (संशोधन), सदस्य-सचिव, (४) वरिष्ठ संशोधन अधिकारी, सदस्य, (५) संशोधन अधिकारी, सदस्य.

**दक्षता पथक—**(१) पोलीस उप अधिक्षक, (२) पोलीस निरीक्षक, (३) पोलीस शिपाई.

आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे हे वरील सर्व समित्यांचे अध्यक्ष आहेत. अनुसूचित जमातीचा दावा असलेल्या अर्जदाराचा अर्ज तपासणी समितीस प्राप्त झाल्यानंतर त्या अर्जासोबत जमातीचा दावा सिद्ध होण्यासाठी आवश्यक कागदोपत्री पुरावे जोडलेले आहेत किंवा कसे याबाबत छाननी करण्यात येते. त्यानंतर ज्या उमेदवाराच्या दाव्याबाबत शंका वाटत नसेल असे दावे निकाली काढण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येते. तथापि बहुतांशी प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशानुसार दक्षता पथकामार्फत प्रथम शालेय व गृह चौकशी करण्यात येते. त्या चौकशीचा अहवाल समितीस प्राप्त झाल्यानंतर समिती त्या अहवालाची प्रत संबंधित अर्जदारास पाठविते व त्यावर त्याचे लेखी म्हणणे मागविते. अशा लेखी म्हणण्यामध्ये उमेदवाराने जर प्रत्यक्ष सुनावणी घेण्याची विनंती केली असेल तर त्यास सुनावणीची संधी देण्यात येते. लेखी म्हणणे व सुनावणीनंतर समितीतील अध्यक्ष व सदस्य सर्व निकषांच्या आधारे त्याच्या

दाव्याबाबत अंतिम निर्णय घेतात. दावा सिद्ध झाला असेल तर अर्जदारास त्यांच्या जमातीच्या प्रमाणपत्राबाबत 'वैधता प्रमाणपत्र' निर्गमित करण्यात येते. दावा सिद्ध झाला नसेल तर अर्जदाराचे जमातीचे प्रमाणपत्र अवैध असल्याचा निर्णय (स्पिकिंग ऑर्डर) निर्गमित करण्यांत येतो.

सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशानुसार तपासणी समितीचा निर्णय अंतिम आहे. समितीचा निर्णय मान्य नसेल तर त्याविरुद्ध फक्त उच्च न्यायालयातच अपिल करण्याची तरतूद आहे.

समितीने राज्यातील बऱ्याच शासकीय व निमशासकीय कार्यालयाला भेटी दिल्या, त्यावेळेस समितीस असे आढळून आले की, जात पडताळणी समिती कडून वेळेवर जात पडताळणी प्रमाणपत्र न देता संबंधित अधिकारी अर्जदाराकडून काही अपेक्षा ठेवून गैर हेतूने जाणीवपूर्वक विलंब लावतात. तर काही प्रकरणे जात पडताळणी दक्षता पथकाकडे पाठविली जातात. दक्षता पथकाकडे प्राप्त झालेल्या प्रकरणावर दोन-तीन वर्षे निर्णय घेतला जात नाही. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांचे शासकीय/निमशासकीय नोकरी मध्ये निवड झालेली आहे अशा निवड झालेल्या उमेदवारांना जात पडताळणी समितीच्या नाकर्तेपणामुळे व त्यांनी हेतू पुरस्सर केलेल्या विलंबामुळे त्यांना नोकरी पासून वंचित रहावे लागते असे समितीच्या निदर्शनास आले आहे.

राज्यात अनुसूचित जमातीच्या जात प्रमाणपत्र तपासणीसाठी एकूण किती पडताळणी समित्या कार्यरत आहेत ? जात पडताळणी समितीने किती अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांना वैध/अवैध (बोगस) ठरविले आहे ? या संदर्भात आयुक्त कार्यालयाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे असे समितीने विचारले असता समितीस पुढीलप्रमाणे लेखी माहिती देण्यात आली :—

राज्यात पुणे, नाशिक, नागपूर, ठाणे औरंगाबाद, अमरावती, नंदुरबार व गडचिरोली या आठ ठिकाणी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीची स्वतंत्र कार्यालये कार्यरत आहेत.

सदर समिती कार्यालयांकडील मागिल २ वर्षात अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांची (सेवाविषयक प्रकरणे) अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्र तपासणीबाबत प्राप्त, निकाली व प्रलंबित असलेल्या प्रकरणांची माहिती खालीलप्रमाणे देण्यात आली आहे :—

| अ. क्र. | वर्ष | मागिल वर्षात प्रलंबित प्रकरणे | चालू वर्षात प्राप्त प्रकरणे | एकूण प्रकरणे | निकाली काढलेली प्रकरणे | | | | इतर समितीकडे वर्ग केलेली प्रकरणे | प्रलंबित प्रकरणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वैध | अवैध | इतर कारणाने निकाली काढलेली प्रकरणे | एकूण प्रकरणे | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १. | २००८-०९ | ७९७९ | ८१५६ | १६१३५ | ७४४१ | ६४९ | २१ | ८१११ | ४९१ | ७५३३ |
| २. | २००९-१० | ७५३३ | ७३७९ | १४९१२ | ५४६७ | ४३२ | ३९४ | ६२९३ | ८३ | ८५३६ |

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांकडून अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणीसाठी प्राप्त झालेल्या अनुसूचित जमाती दाव्याच्या प्रकरणात तपासणी करून केवळ वैध/अवैधतेचे निर्णय दिले जातात. समितीने दिलेल्या अवैधतेचे निर्णयावर पुढील प्रशासकीय कारवाई संबंधित विभागाची आहे. अद्यापपर्यंत अनुसूचित जमातीच्या अधिकारी व कर्मचारी वर्गाची एकूण ८५३६ प्रकरणे मार्च, २०१० अखेर जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत.

सदर प्रकरणे प्रलंबित असल्याची सर्वसाधारण कारणे, काय आहेत असे समितीने विचारले असता समितीस पुढीलप्रमाणे लेखी माहिती दिली :—

(१) अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणीसाठी प्राप्त होणाऱ्या प्रकरणात 'महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३' मधील नियम ११ (१) अन्वये अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्र तपासणीचा 'नमुना-इ' मध्ये माहिती अर्जदार देत नाहीत.

(२) त्याचप्रमाणे नियम ११ (२) (३) अन्वये अर्जदाराने अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या तपासणीसाठी अर्जाच्या नमुन्या सोबत शपथपत्र 'नमुना-क' मध्ये सादर करणे आवश्यक आहे ते सादर करीत नाहीत.

(३) 'महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३' मधील नियम ११(२) मध्ये अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणीसाठी निर्धारीत केलेली आवश्यक कागदपत्रे अर्जदार समितीस सादर करीत नाहीत.

(४) अर्जदाराने सादर केलेल्या पत्रावर समितीचे समाधान झाले नाही तर अशी प्रकरणे पोलीस दक्षता पथकाकडे शालेय व गृह चौकशीसाठी सोपवण्याची कायद्यात तरतूद आहे त्यानुसार अशी प्रकरणे दक्षता पथकाकडे चौकशीसाठी देण्यात येतात. दक्षता पथकाने चौकशी करून अहवाल सादर केल्यानंतर जर चौकशीमध्ये अर्जदाराच्या दाव्याच्या विरोधात कागदपत्रे / दस्ताऐवज / माहिती समोर आल्यास, सदरच्या अहवालाची प्रत अर्जदारास पाठवून त्याबाबत त्याचे स्पष्टीकरण प्राप्त करून घ्यावे लागते. दक्षता पथकाचा चौकशी अहवाल अर्जदाराच्या दाव्याच्या विरोधात असल्याने बरेच अर्जदार त्यांचा दावा प्रलंबित राहण्यासाठी विविध कारणे पुढे करून समितीस वेळेवर स्पष्टीकरण सादर करीत नाहीत, त्यामध्ये कालापव्यय होतो.

(५) दक्षता पथकाच्या अहवालाची प्रत अर्जदारास दिल्यानंतर व त्यानंतर त्यावर अर्जदाराचे स्पष्टीकरण प्राप्त झाल्यानंतर, कायद्यातील तरतुदीनुसार अर्जदारास समितीसमोर सुनावणीची संधी देणे क्रमप्राप्त आहे. त्यानुसार अर्जदारांना सुनावणीची संधी देण्यात येते. तथापि, बरेचसे अर्जदार त्यांच्या दाव्यात समितीची शंका निर्माण झाल्याचे त्यांना वाटल्याने समितीसमोर सुनावणीस येण्याचे टाळतात व विविध कारणे पुढे करून सुनावणीच्या पुढच्या तारखांची मागणी करतात. नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार अर्जदारास सुनावणीची संधी द्यावी लागते व पर्यायाने प्रकरणे प्रलंबित राहून कालापव्यय होतो.

(६) समितीचे कामकाज हे अर्धन्यायिक स्वरूपाचे असते समितीवरील सदस्य/अधिकारी यांच्या पदस्थापना ही आदिवासी विकास विभागातील इतर प्रभागातून जसे प्रकल्प अधिकारी/अपर आयुक्त/आदिवासी विकास आयुक्त/आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था आयुक्तालयामधून होत असते व या प्रभागातून समितीकडे व समितीकडून या प्रभागाकडे बदल्या होत असतात म्हणून समिती मधील अधिकारी हे नेहमी या अर्धन्यायिक स्वरूपाचे कामाशी संबंधित रहात नाहीत. तसेच एखाद्या अर्जदाराचे प्रकरण सुनावणीपर्यंतची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर समितीमध्ये बदल झाल्यास बदललेल्या समिती सदस्यांना जुन्या समितीने सुनावणी घेतलेल्या प्रकरणी निर्णय करता येत नाही, कारण त्याबाबत नंतर मा.उच्च न्यायालयात आक्षेप नोंदविण्याचे प्रकार विविध प्रकरणात यापूर्वी झालेले आहेत. त्यामुळे समितीमध्ये अनपेक्षितपणे/अचानक काही बदल झाल्यास, पुन्हा बदललेल्या समितीसमोर, प्रलंबित प्रकरणांतील अर्जदार यांना नव्याने सुनावणीची संधी देणे क्रमप्राप्त होते. यामुळेही बरीच प्रकरणे समितीकडे प्रलंबित असल्याचे दिसून येते.

(७) तसेच बहुतांश प्रलंबित प्रकरणी अर्जदार हे त्यांच्या वतीने वकील नियुक्त करतात. त्यांच्या वकीलांना इतर न्यायालयीन प्रकरणांमध्ये तारखा असल्याने समितीकडील तारखांना उपस्थित राहू शकत नसल्याने वारंवार मुदतवाढ मागून घेतात व पर्यायाने प्रकरणे प्रलंबित राहतात.

(८) समितीच्या निर्णयाविरुद्ध मा.उच्च न्यायालयात दाद मागण्याची तरतूद असल्याने समितीने दावा अवैध केल्यानंतर बऱ्याच प्रकरणी मा.उच्च न्यायालयात समितीच्या निर्णयाविरुद्ध दावे दाखल होतात. सदर दाव्यांमध्ये समितीच्या वतीने शपथपत्र दाखल करणेकामी समितीचे अधिकारी/कर्मचारी यांना मा.उच्च न्यायालय येथे शासकीय अभियोक्ता कार्यालयात उपस्थित रहावे लागत असल्यानेही समितीच्या कामकाजास मनुष्यबळ कमी पडते व पर्यायाने समितीकडील कामकाज प्रलंबित राहते.

समितीने राज्यात बऱ्याच शासकीय कार्यालय / निमशासकीय कार्यालये / मंडळ, महामंडळांना भेटी दिल्या आहेत. सदर भेटीच्यावेळेस त्यावेळेस, जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्यासंबंधी समितीकडे अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. पुण्याच्या जात पडताळणी समितीच्या उपाध्यक्षांनी आदिवासी विकास विभागाचे सचिव (श्री.खोब्रागडे) यांचे पत्र आणले अशाप्रकारे शासनाकडून दबाव आणल्यामुळे एका मुलीचे जातीचे प्रमाणपत्र अपात्र केले. याबाबत समितीकडे तक्रार प्राप्त झाली आहे. अशा प्रकारे जात पडताळणी समितीच्या उपाध्यक्षांनी एखाद्या व्यक्तिचे जातीचे प्रमाणपत्र अपात्र केल्यास त्यावर दाद मागता यावी यासाठी पुण्याला संशोधन समिती असणे आवश्यक आहे. परंतु तशी कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे त्यासाठी उच्च न्यायालयात जावे लागते. न्यायालयात गेल्यावर त्यावर ४-५ वर्षानंतर निर्णय लागतो, तोपर्यंत संबंधित व्यक्तीचे वय वाढल्यामुळे त्याला जात पडताळणी प्रमाणपत्राचा फायदा मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

या संदर्भात कायदा तयार करीत असताना, अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील लोकांचा विकास होऊ नये, त्यांचे नुकसान व्हावे हाच मुख्य उद्देश डोळयासमोर ठेवला असावा असे वाटते. त्यामुळे एस.टी. प्रवर्गातील लोक जात पडताळणी समितीकडे जाण्यासाठी तयार नसतात. औरंगाबाद येथील दक्षता पथकामध्ये कार्यरत असलेल्या दोन पोलिसांची इतरत्र बदली झाली असताना त्यांची पुन्हा दोन महिन्यातच त्या ठिकाणी नेमणूक करण्यात आली. या संदर्भात कायदा होऊन ५ वर्षे झालली आहेत. जात पडताळणी समितीचे अध्यक्ष पुण्याला असतात, ते जात पडताळणी समितीच्या बैठकीला कधीच उपस्थित नसतात. त्यांच्या अनुपस्थितीत जात पडताळणी समितीचे उपाध्यक्ष बैठक घेत असतात. सदरहू बैठकीसाठी ३ जणांचा कोरम आवश्यक असतो. सदरहू बैठकीच्या संदर्भात रोजनामे लिहिले पाहिजेत असे शासनाचे परिपत्रक आहे. परंतु या संदर्भात रोजनामे लिहिले जात नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.

मा. समिती प्रमुखांनी बीड येथे जात पडताळणी समितीचा कॅम्प निश्चित केला होता. सदर कॅम्प मध्ये संबंधित अधिकारी ५६ प्रकरणे घेऊन आले. समिती प्रमुखांनी चौकशी केली असता चौकशीचे काम चालू आहे असे सांगण्यात आले. जिल्हाधिकारी श्री. सासणे यांना बोलावण्यात आले व त्यांच्या हस्ते फक्त ४ वैधता प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. त्यानंतर जिल्हाधिकारी निघून गेले. मा. समिती प्रमुखांनी अनौपचारिकरित्या चौकशी केली असता असे कळले की, ज्यांनी अडीच-अडीच लाख रुपये अगोदरच दिले होते त्यांचीच वैधता प्रमाणपत्रे तयार होती. ५६ पैकी ५२ प्रकरणे अनिर्णित ठेवण्यात आली. या ५२ अर्जदारांना वैधता प्रमाणपत्रे द्यावीत अशी समिती प्रमुखांनी विनंती केली असता, प्रलंबित प्रकरणाची तपासणी करणे बाकी आहे, असे सांगण्यात आले. ज्यांनी अगोदरच २.५-२.५ लाख रुपये दिले त्यांना वैधता प्रमाणपत्रे देण्यात आली. इतरांचे काय ? प्रमाणपत्रे टाईप करावी लागतील असे सांगण्यात आले. समितीचे उपाध्यक्ष श्री. माईसाहेब यांची नागपूर येथे बदली झाली. एकाही आदिवासी बांधवाने औरंगाबादला जायचे नाही म्हणून ठरविले. त्यांना सोमवारची तारीख दिली गेली. श्री.माईसाहेब यांची बदली झाली, त्यांच्या जागी श्री.वाघमारे साहेब यांची नियुक्ती झाली. त्यांनी सगळी कागदपत्रे मागविली. फक्त रेट जो अडीच लाख रुपये होता, तो खाली आणण्यात आला आणि प्रत्येकाकडून पैसे घेण्यात आले. पैसे घेतल्यानंतर पुढील सोमवारी अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या अध्यक्ष या नात्याने त्यांच्या हस्ते वैधता प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. ही बाब फार गंभीर आहे. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. धाड टाकली तर अधिकारी/कर्मचाऱ्यांकडे १०० टक्के पैसे सापडतील, असे प्रकार औरंगाबाद येथील कार्यालयात घडते असे नाही तर महाराष्ट्रातील सर्वच विभागीय कार्यालयात पैसे घेऊन जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याचे सत्र सुरू आहे. त्यांना अर्धन्यायिक अधिकार दिले आहेत. त्या कार्यालयात एजंट, सबएजंट, सबएजंटचे सबएजंट, प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे एजंट तयार झाले आहेत.

पोलीस दक्षता पथक म्हणजे काय ? भिल्ल, पारधी जातीच्या लोकांना दक्षता पथकाकडून तपासणी करून घ्या असे सांगण्यात येते. त्या दक्षता पथकाकडे गेल्यानंतर पी.आय. हा ए.पी.आय.ला सांगतो. ए.पी.आय. हा पी.एस.आय.ला सांगतो. प्रत्येक जिल्ह्यासाठी एक स्वतंत्र पी.आय. नेमण्यात आला आहे. ते पारधी, ठाकर किंवा अन्य कोणाच्याही घरी तपासणी करण्यासाठी जातात. त्यांचे रेट ठरले आहेत. पारधी समाजासाठी १.४० लाख, ठाकर समाजासाठी १.७० लाख रेट ठरलेला आहे. समितीच्या असेही निदर्शनास आले की, बोगस प्रमाणपत्र द्यायचे झाल्यास ५ ते १० लाख रुपयांपर्यंत रेट आहे. १०-१० लाख रुपये घेऊन १० बोगस प्रमाणपत्रे दिली तर १ कोटी रुपयांची कमाई करता येईल. म्हणजे १ कोटी रुपये जमा करून स्वेच्छानिवृत्ती घेऊ शकतील. अशा प्रकरणाचा संबंधित विभागाचे सदर अधिनियमाचा व्यवस्थित अभ्यास करावा. त्यामुळे कोणत्या ठिकाणी त्रुटी आहेत. कायद्यामध्ये कुठे कुठे त्रुटी आहेत हे माझ्या लक्षात आलेले आहे. हे तपासून कायद्यामध्ये दुरुस्ती करण्याची समितीला आवश्यकता वाटते.

समितीने सुनावणी किती वेळा घ्यावी याचे नियम नाहीत. ४-४, ५-५ वेळा सुनावणी घेण्यात येते. तपासणी पूर्ण होत नाही तोपर्यंत सुनावणी सुरूच राहते. सुनावणीबाबत बंधन असले पाहिजे. व्ही.सी.ए.रिपोर्ट आला की, दक्षता समितीकडे पाठविला जातो. दक्षता समितीकडून तपासणी झाल्यानंतर पुन्हा पुढे पाठविला जातो. तोपर्यंत जेवढे एजंट भेटतील त्यांनी त्याच्याकडून पैसे घ्यायचे असे प्रकार सुरू आहेत. समिती समोर असेही एक प्रकरण आले आहे की, नांदेड येथील ठाकूर समाजाचा मुलगा परभणी जिल्हा परिषदेमध्ये नोकरीला लागला. नोकरी लागल्यानंतर त्याने वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला. त्याला सुनावणीची तारीख दिली गेली. त्या मुलाची नोकरी गेली, त्याला पत्र आले की, उद्या तुमची मुलाखत आहे. ६ जुलैला मुलाखत असताना त्याबाबतचे पत्र त्याला पोस्ट खात्यामार्फत ७ जुलैला प्राप्त झाले. ७ जुलै रोजी पत्र मिळाल्याबरोबर तो ताबडतोब जात पडताळणी समितीकडे गेला. समितीकडे त्याने लेखी विनंती केली की, मला मुलाखतीचे पत्र पोस्ट खात्याच्या चुकीमुळे विलंबाने मिळाले. कृपया मला सुनावणीची संधी द्यावी. यामध्ये त्याची काय चूक होती ? त्याला ८ तारखेला कळविले गेले की, विलंब झाल्यामुळे तुमचे प्रकरण अपात्र करण्यात येत आहे. ही बाब फार गंभीर असून मानवजातीला काळीमा फासणारी घटना आहे असे समितीचे मत झाले आहे, या प्रकरणासाठी सदर विद्यार्थ्यांस समितीच्या निणर्यानंतर अपील करावयाचे झाल्यास हायकोर्टातच जावे लागते. किरकोळ चूक आहे. या संदर्भात संशोधन समितीच्या अध्यक्षांकडे अपील करण्याची तरतूद असणे आवश्यक होते. त्या मुलाची नोकरी जाऊन १० वर्षे झाली. इतकी वाईट अवस्था झालेली आहे. किती दिवसात जात पडताळणी प्रमाणपत्र दिले पाहिजे याला कालमर्यादा असणे आवश्यक आहे. समितीकडून जेवढी प्रकरणे अपात्र करण्यात आली ती सर्व प्रकरणे उच्च न्यायालयाने पात्र केली. उच्च न्यायालय पुंन्हा समितीकडे जावे म्हणून निदेश देते. परंतु समिती मान्य करीत नाही. हा कायदा तयार करीत असताना अत्यंत चुकीची रिमेडी तयार केली. समितीच्या निर्णयानंतर अपील करावयाचे झाल्यास उच्च न्यायालय हाच मार्ग उपलब्ध आहे. समितीचे अध्यक्ष किंवा आदिवासी विकास विभागाचे सचिव यांच्याकडे अपील करण्याची संधी देणे आवश्यक आहे.

विभागाच्या सचिवांनी पत्र पाठविल्यानंतर समितीचे उपाध्यक्ष म्हणतात, आमच्यावर प्रशासकीय दबाव आणण्यात आला. श्री.खोब्रागडे साहेबांकडून माझ्यावर दबाव आणला म्हणून तुमचे प्रकरण अपात्र करण्यात येत आहे. हा एक प्रकारे राज्यातील जात पडताळणी समितीच्या उपाध्यक्षांचा हुकुमशाहीपणा चाललेला आहे.

(१) पुणे विभागाच्या संशोधन समितीच्या उपाध्यक्षांनी हे लिहिले आहे. श्री.खोब्रागडे साहेबांचे पत्र आणून आमच्यावर प्रशासकीय दबाव आणला म्हणून प्रकरण अपात्र केलेले आहे. अर्धन्यायिक अधिकार दिले. परंतु हा न्याय आहे काय ? एम.ए. पी.एचडी झालेली ठाकर समाजाची मुलगी आहे. तिचे दोन भाऊ उच्चशिक्षित आहेत. एक-एक प्रकरण ऐकले तर फार वाईट वाटते. अशा समितीने तीव्र भावना व्यक्त केल्या. (२) पोलीस सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्याचे निधन झाले. त्याच्या सेवापुस्तकामध्ये 'महादेव कोळी' अशी जातीची नोंद आहे. त्याचा मुलगा मोठा झाला. एस.टी.महामंडळाच्या सेवेमध्ये आल्यानंतर जातीचे प्रमाणपत्र पडताळणी करून आणले नाही म्हणून सेवेतून काढून टाकले. त्याचे वडील पोलीस सेवेत होते, त्यांच्या दाखल्यावर 'महादेव कोळी' असे नमूद केलेले असताना त्या मुलाला महादेव कोळी जातीचा दाखला दिला जात नाही. दक्षता समितीने चौकशी केली. त्याच्या दाखल्यावर अस्पष्टपणे दिसते असे नमूद केले. वडील अगोदरच शासनाच्या सेवेत असतील आणि त्यांच्या दाखल्यावर जी जात असेल त्या जातीचा दाखला मुलाला मिळण्यामध्ये अडचण का येते ? पैसे दिले तर दाखला मिळू शकतो. पैसे दिले नाहीत तर दाखला मिळत नाही. इतका अंधाधुंद कारभार सुरू आहे. अशा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीवर समिती तीव्र संताप व्यक्त करून अशा प्रकरणाचा निषेध व्यक्त करते. हजारो प्रकरणे प्रलंबित आहेत. या जातीमध्ये उच्चशिक्षणाचे प्रमाण पूर्वी फार कमी होते. आता निवडणूक, डी.एड, बी.एड, टेक्नीकल एज्युकेशनसाठी जातीचा दाखला आवश्यक केला आहे.

अनुसूचित जमातीच्या यादीतील काही जमातीच्या नामसदृष्याचा फायदा घेऊन बिगर आदिवासी लोक त्या जातीचे प्रमाणपत्र मिळवून साऱ्या आदिवासींवर अन्याय होऊ नये त्या समाजाला जातीचे प्रमाणपत्र त्वरित मिळावे. सदर प्रमाणपत्राची तपासणी वेळेत होण्यासाठी शासनाने 'अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील व्यक्ती यांना जातीचे प्रमाणपत्र देणे व अशा प्रमाणपत्राचे पडताळणी करणेबाबतचे विनियमन करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम' हा सन २००१ पासून अंमलात आणण्यात आला. सदर अधिनियमातील कलम ७(२) याचा वेगळा अर्थ काढून एखाद्या विधान मंडळाच्या समितीने साक्षीसाठी बोलविल्यास त्या त्या समितीच्या बैठकीस हेतुपुरस्सर गैरहजर राहणे असे वारंवार प्रकार घडत आहे. अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक [redacted] व नंदुरबार येथे आयोजित केली होती. परंतु

यवतमाळ

सदर बैठकीस तेथील सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती हे हेतुपुरस्सर गैरहजर राहिलेत. त्याचप्रमाणे याच उपाध्यक्षांनी दिनांक १२ जानेवारी २०१० रोजी एक पत्र मा. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था यांना लिहिले असून सदर पत्रात त्यांनी असे नमूद केले आहे की, आदिवासी विकास विभागाने विधान मंडळातील सर्व सदस्यांना हस्तक्षेप न करण्याबाबत कळवावे असे या समितीचे दिनांक ९ जून २००८ रोजी कळविले असून त्यावर शासनाकडून अद्याप कार्यवाही झाली नाही असेही त्यांनी पत्रात नमूद केले आहे. अशा प्रकारे उद्धट अधिकाऱ्यांकडून आदिवासी जनतेचे कल्याण होण्याऐवजी खऱ्या आदिवासीवरच अन्याय होण्याची दाट शक्यता असून शासनाचे 'महाराष्ट्र अधिनियम, २००१ च्या कलम ७(२) अन्वये दिलेल्या अधिकाराची जात पडताळणी समिती गैरफायदा घेऊन जात पडताळणी प्रमाणपत्र देण्यासाठी प्रत्येक आदिवासी अर्जदारांकडून लाखो रुपये घेत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

अनुसूचित जमातीच्या अनुशेष अग्रक्रमाने काढण्याबाबत व जात वैधता प्रमाणपत्र नसलेल्या कर्मचाऱ्यांना तातडीने सेवेतून मुक्त व ज्यांना पदोन्नती घेतली आहे अशांना मूळ पदावर आणून खुल्या प्रवर्गात निवड असावी अशा प्रकारचा सुप्रीम कोर्ट व शासन निर्णय असताना देखील अशा कारवाईबाबत दिलेल्या नोटिसीच्या आधारे **कामगार न्यायालयाचे किंवा औद्योगिक न्यायालयाचे स्थगितीचे आदेश संबंधित कर्मचाऱ्यांच्याकडून आणले जातात असे आदेश संबंधित कर्मचाऱ्यांनी आणले असतील तर सदर न्यायालयाचे आदेश विभाग प्रमुखांनी मानू नये असे सर्व संबंधित विभागांना कळविण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.**

देशाला स्वातंत्र्य मिळून ६३ वर्षे पूर्ण झाली व प्रचंड निधी खर्च करुनही आजपर्यंत आदिवासींचा विकास किती तर वास्तवात फक्त १५% म्हणून एवढा प्रचंड निधी खर्च करुनही आदिवासींचा विकास झाला नाही असे समितीला वाटते.

कुपोषण, व्यसनांधता, अज्ञान व इतर समाजापासून अलिप्तता हे गुण आदिवासी जनतेत कायम आहेत. भरपूर निधींची तरतूद असून तो खर्च होवूनही तो त्यांच्यापर्यंत पोहचत नाही ही शोकांतिका आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सवलती हे आदिवासींपुरते फक्त भूषण आहे. त्या मिळण्यासाठी त्यांना मार्गात अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.

" सवलतीचा कावळा जातीचा दाखला असल्याशिवाय मिळत नाही, पण जातीचा दाखला काढण्यातच त्याची सर्व शक्ती वाया जाते. "

जातीचे प्रमाणपत्र मिळविणे व त्याची जात पडताळणी करण्याची प्रक्रिया अतिशय किचकट, खर्चिक आणि वेळकाढूपणाची असल्यामुळे आदिवासींचे अनेक मुलभूत प्रश्न न सुटता आजही जसेच्या तसेच प्रलंबित आहेत.

(शा.म.मु.) एचबी १५००–४ (३५०—८–२०१०)

**महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) नियम २००३ नुसार.**

(१) ज्या व्यक्तीला अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळवायचे आहे तिला ग्रामसेवक, पोलीस पाटील, सरपंच, तलाठी यांच्याकडून जातीचे प्रमाणपत्र घेवून शाळेतून प्रवेश निर्गम उतारे घ्यावे लागतात. वडीलांच्या बाजूकडील पुरावे व शपथपत्रे घ्यावी लागतात. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे **राष्ट्रपतींनी जमात अधिसूचित केली त्या तारखेपूर्वीचा (६ सप्टेंबर १९५०) पुरावा** द्यावा लागतो. मग सेतूमध्ये फॉर्म भरुन तो तहसीलमध्ये कारकुन, अव्वल कारकुन, नायब तहसीलदार, तहसीलदार, उप विभागीय अधिकारी कार्यालयातील कारकुन अ. कारकुन यांच्या सह्या होवून तो शेवटी उप विभागीय अधिकाऱ्यांसमोर येतो. बहुतांश प्रस्तावांमध्ये सर्व पुरावे असूनही महसुली पुरावे जोडा /शैक्षणिक पुरावे जोडा असे फाईल न पाहताच लिहून ती फाईल परत करण्यात येते.अशा प्रकारे ती फाईल ३-४ वर्षे असाच प्रवास करीत राहते.

**वरील अधिनियमानुसार १९५० पूर्वीचा पुरावा आवश्यक आहे. परंतु जे आजही भूमिहीन आहेत, घरे सुध्दा नाहीत असे आदिवासी १९५० पूर्वीचा पुरावा कसे देणार, बरेचसे आदिवासी जातीचे प्रमाणपत्र काढण्याच्या या किचकट कार्यपध्दतीमुळे व पुरावा मिळत नसल्यामुळे प्रमाणपत्र काढण्याच्या मागे लागत नाहीत किंवा मध्येच नाद सोडून देतात. त्यामुळे आदिवासींसाठी कोटयावधींच्या योजना असूनही त्यांचा लाभ जातीच्या प्रमाणपत्राअभावी त्यांना मिळू शकत नाही.**

(२) त्यातच सन १९७६ ला भारतीय संसदेने क्षेत्रबंधन उठवले असले तरी डॉ. गोविंद गारेंच्या अर्धशासकीय पत्रानुसारच महाराष्ट्र शासनाचा दिनांक ८ जुलै, १९८२ चा शासन निर्णय सर्वोच्च न्यायालयाने रद्दबादल ठरवत असंविधानिक ठरवला असल्यामुळे आता महाराष्ट्रात कुठेही क्षेत्रबंधन नाही. तरीही जुन्याच डॉ.गोविंद गारेंच्या पत्राचा अर्थ लावून आदिवासीच नाहीत असे तोंडी सांगून अर्ज दाखल करुन घेण्यासाठी मनाई केली जाते. **तेंव्हा २६ जुलै २००० च्या शासन निर्णयानुसार " ठाकर " समाजाला अनु.जमातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी सर्व उप विभागीय अधिकारी व जातपडताळणी समितीला शिफारस देण्यात याव्यात.**

(३) नमुना " ई " जोडून जातीचे प्रमाणपत्र काढण्यासाठी लागतात, ती सर्व आवश्यक ती कागदपत्रे व प्रतिज्ञापत्रे जोडून तयार झालेली प्रकरणे शिक्षण /सेवा /नोकरी / या कारणात्सव जातपडताळणी समितीकडे दाखल करण्यात येते. मग ती फाईल तेथून दक्षता समिती कडे जाते. DYSP, PT, पो.कॉ. चे पथक गावात येवून गावातील लोकांमध्ये चौकशी करतात. बहुतेक ठिकाणी लोकांनाही यांच्याबद्दल सविस्तर माहिती नसते किंवा मुद्दाम

माहिती देत नाहीत. त्याची दक्षता समितीकडून लगेच योग्यती तपासणी होते आणि असे पात्र प्रस्ताव दक्षता समितीकडून आले की, ते संशोधन अधिकाऱ्यांकडे पाठविले जातात. तद्‌नंतर सदरील जातप्रमाणपत्र तहसील/ उप विभागीय अधिकाऱ्याने निर्गमित केले का ? यासाठी पत्र पाठवले जाते. बहुतेक तहसिलदार कार्यालयात संचिकाच सापडत नाहीत. प्रमाणपत्र निर्गमित केल्याचा अहवाल पाठवला जातो व पुन्हा समितीच्या तीन सदस्यांसमोर फाईल पाठविण्यात येते. अनेक प्रकरणांमध्ये सन १९५० पूर्वीचे पुरावे व जवळच्या नातेवाईकांचे वैधता प्रमाणपत्र असूनही काही वेळा प्रस्ताव अवैध ठरविले जातात व त्यामुळे मूळ आदिवासी नागरिक शासनाच्या सवलती मिळण्यापासून वंचित राहतात.

(४) तेव्हा **जातीचे प्रमाणपत्र देण्याच्या व पडताळणीच्या प्रक्रियेत काही सुधारणा करणे गरजेचे आहे असे समितीला वाटते.** अनुसूचित जाती- जमाती हा राष्ट्रपती सूचीतील विषय असल्यामुळे कोणत्याही राज्याला त्यात हस्तक्षेप करता येत नाही, असे मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १२ जुलै १९९९ रोजी निर्णय दिलेला आहे. केंद्रामध्ये जातपडताळणी समिती नाही. जात प्रमाणपत्र देण्याच्या व जात पडताळणीच्या प्रक्रियेत पुढील सुधारणा करणे गरजेच आहे, असे समितीचे मत आहे :—

**(१) वरील कायद्याच्या कलम ३ मध्ये पोट-कलम (३) च्या खंड ‘ ख ’ अन्वये संबंधित अनु. जमातीच्या अधिसूचनेच्या दिनांकापूर्वीचा ( ६ सप्टेंबर, १९५० रोजी किंवा त्या विशिष्ट जमातीच्या अधिसूचनेच्या दिनांकास जेथे अर्जदाराचे कुटुंब राहात होते ते ठिकाण) जमातीबाबतचा किंवा निवासाचा सर्वसाधारण ठिकाणाबाबतचा लेखी पुरावा आदिवासीकडे मागण्यात येऊ नये.**

**(२) ज्याच्याकडे रक्तनात्यासंबंधातील नातेवाईकांचे वैधता प्रमाणपत्र असेल त्याला जास्त चौकशी न करता एक महिन्याच्या आत वैधता प्रमाणपत्र देण्यात यावे.**

**(३) भारतीय संसदेने क्षेत्रबंधन उठवलेला अनु.जाती, अनु.जमातीचा सुधारीत कायदा क्र. १०८/ १९७६ अन्वये व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि. १२ जून, १९९९ च्या पांडूरंग रंगनाथ चव्हाण यांच्या “ ठाकर ” जातीसंदर्भात दिलेल्या आदेशानुसार संपूर्ण महाराष्ट्रात क्षेत्रबंधन राहीले नसून प्रमाणपत्र देण्यासाठी सर्व उप विभागीय अधिकाऱ्यांना पत्रक/आदेश काढून सूचित करण्यात यावे.**

**(४) आदिवासींना त्रासदायक ठरणारी जात पडताळणी समिती तात्काळ रद्द करावी व त्याऐवजी अतिरिक्त जिल्हाधिकारी या दर्जाच्या स्तरावरील स्वतंत्र अधिकारी उपाध्यक्ष म्हणून नेमण्यात यावे या समितीचे अध्यक्ष, आदिवासी विकास आयुक्त राहतील. विशेष समाज कल्याण अधिकारी व आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी हे या समितीचे सदस्य राहतील, तसेच**

दक्षता समिती काढून टाकण्यात यावी. त्याप्रमाणे जात पडताळणीबाबत अपिल करण्याचे अधिकार आदिवासी विकास विभागाचे प्रधान सचिव, यांचेकडे राहतील. अशी ही समिती शिफारस करीत आहे. सदर शिफारशीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्याच्या आत समितीस पाठविण्यात यावा, शासनाने महाराष्ट्र अधिनियम, २००१ च्या कलम ७ (२) अन्वये जात पडताळणी समितीच्या निर्णयास फक्त मा. उच्च न्यायालयातच आव्हान देता येते. हे कलम आदिवासी जनतेला न्याय देण्याऐवजी त्या जनतेवर अन्याय करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना मोकळीक असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. म्हणून 'महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-२३, २००१ मधील कलम ७(२) व कलम ९ सह खंड (अ), (ब), (क), (ड), (ई) पुर्णतः वगळण्याबाबत विभागाने तातडीने कार्यवाही करावी.

**(२३) गॅस युनिट वाटप योजना** समितीने या योजनेबाबत विचारले असता समितीस पुढील प्रमाणे माहिती देण्यात आली.

राज्यातील आदिवासी क्षेत्र हे प्रामुख्याने डोंगराळ भागात आहे. अतिदुर्गम भागात आदिवासी राहात असल्याने त्यांचा जंगलाशी जवळचा संबंध आहे. आदिवासी प्रामुख्याने जंगलामधुन लाकूडफाटा व इतर साहित्याचा वापर आपल्या दैनंदिन जीवनात करत असतात आणि त्यामुळे जंगलतोड होत असते. अनुसूचित जमातीची जी कुटुंबे जंगलात व जंगलाच्या कडेला असतील व ज्यांचा स्वयंपाक जळाऊ लाकडावर असतो अशा कुटुंबाना गॅस युनिट देऊन वृक्ष / लाकुडतोड थांबवणे, पर्यावरणांचे संतुलन करणे, राखणे, जमिनीची धुप थांबवणे, पर्जन्यवृष्टीमध्ये वाढ व त्यांच्या घरातील वातावरण धुरापासून मुक्त करणे व त्यांच्या आरोग्यात सुधारणा करणे इत्यादी बाबी विचारात घेऊन शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन एका लाभार्थ्यास १४.२ कि.ग्रॅ. सिलेंडर गॅस शेगडीसह जोडणी करून देणे ही योजना दारिद्र्य रेषेखालील आदिवासी कुटुंबासाठी व विधवा, परितक्ता व आदिम जमातीच्या कुटुंबाना प्राधान्याने लाभ देण्याची योजना सन २००६-०७ या वर्षामध्ये व त्यापुढील चार वर्षामध्ये मंजूर करण्यात आली आहे. सदरची योजना प्रकल्प अधिकारी, पेट्रोलियम महामंडळे व आदिवासी विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणार आहे. गॅस एजन्सीची सेवा ही निशुल्क असून गॅस सिलेंडर भरणे इ. चा भविष्यातील खर्च लाभार्थी कुटुंबियांकडून करण्यात येणार आहे. लाभार्थी कुटुंबियांस गॅस युनिट विकता येणार नाही व हस्तांतरीत करता येणार नाही. तसे केल्यास त्यास दोषी मानून त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याची सूचना नमूद करण्यात आली आहे. सन २००६-०७ या आर्थिक वर्षात सदर योजना अंमलबजावणीसाठी रु.३०.०० कोटी पुरवणी मागणीद्वारे निधी उपलब्ध करून देण्यात आला असून दरवर्षी १००,००० कुटुंबाना गॅस युनिट पुरविण्याची योजना आहे. सन २००६-०७ या आर्थिक वर्षात पुरवणी मागणीद्वारे प्राप्त रु. ३०.०० कोटींचा निधी शासन निर्णयानुसार व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांचेकडे वर्ग करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत गॅस

शेगड्या व रबरी नळी व इतर उपकरणे खरेदीबाबत संबंधित पुरवठाधारकास पुरवठा करण्याचे आदेश महामंडळाच्या स्तरावरुन देण्यात आले आहे.

या योजनेबाबत गेल्या दोन वर्षात किती आदिवाशींना गॅस युनिटस देण्यात आले. याबाबत माहिती देण्यात यावी, गेल्या दोन वर्षापूर्वी १,२३,९९१ लक्षांक प्राप्त झालेले असून ५०,८३३ बाकी आहेत.

त्याच प्रमाणे समितीस असेही सांगण्यात आले की, आदिवासी विकास महामंडळामार्फत ही योजना राबविली जात असून आदिवासींना गॅस पुरविण्यासाठी मंजूर झालेल्या लक्षांकानुसार १,२३,७०० शेगड्या घेतल्या आहेत. त्यांपैकी ७३,५५८ गॅसच वाटप केल्यामुळे तेवढ्याच शेगड्या लाभार्थींना दिलेल्या आहेत. **म्हणून समितीची अशी शिफारस आहे की, आदिवासींसाठी गॅस युनिट देण्याची योजना हाती घेतली आहे. सदर योजनेच्या माध्यमातून हजारो आदिवासींना गॅस कनेक्शन मिळालेले नाही. ठरवून दिलेल्या लक्षांकाप्रमाणे अद्याप ज्या आदिवासी कुटुंबांना गॅस पुरवठा दिलेला नाही. अशा आदिवासींना त्वरित गॅस पुरवठा देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी,** अशी समितीची शिफारस आहे.

**(२४)** समितीने आदिवासी महिलांचे बचत गट स्थापन केलेल्या महिलांसाठी कोणत्या योजना राबविल्या जातात. याबाबत माहिती विचारली असता समितीस पुढील प्रमाणे लेखी माहिती देण्यात आली. महिला धोरणांतर्गत महिलांचे सक्षमीकरण करणे व सक्षमीकरणातून महिलांचा विकास घडवून आणून स्वयंरोजगासाठी त्याच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे ही बाब लक्षात घेऊन आदिवासी महिलांचे सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत राज्यातील नाशिक, नंदुरबार, ठाणे चंद्रपुर, गडचिरोली, गोंदीया, अमरावती व यवतमाळ जिल्ह्यांमध्ये आदिवासी महिलांकरीता ३ वर्षात ४६०० स्वयंसहाय्यता बचत गट प्रायोगीक तत्वावर स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. राज्यातील आदिवासी महिलांच्या विकासासाठी स्वयंसहाय्यता बचत गटाची निर्मीती, महिलांसाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम, महिला उत्पादनासाठी बाजारपेठ व अनुषंगीक आधारसेवा इ. कार्यक्रम महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यात येतात. समिती राज्यातील बऱ्याच आदिवासी गावामध्ये व पाड्यामध्ये जाऊन प्रत्यक्षभेटी दिल्या असून काही महिला बचत गटांना भेटी दिल्या. काही ठिकाणी आदिवासी महिलांचे बचत गटाचे काम चांगल्या रितीने चालत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. आदिवासी जनतेला दारिद्र्य-रेषेवर आणावयाचे झाल्यास प्रथम आदिवासी व त्यांच्या महिलांचा विकास घडवून आणून स्वयंरोजगाराच्या योजना आखून त्यांना कर्ज देऊन त्यांच्यामध्ये आत्मविश्वास **निर्माण करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे समितीच्या असेही निदर्शनास आले आहे की, आदिवासी गावामध्ये व पाड्यामध्ये शिधावाटप केंद्रामध्ये बऱ्याच वेळा, अन्न धान्य लोकांना वितरित होत नाही. लोकांना रॉकेलचा पुरवठा होत नाही. धान्य व रॉकेलची काळ्या बाजारात विक्री करून शिधावाटप केंद्राचे चालक फार मोठ्या प्रमाणामध्ये गैरव्यवहार करतात. अशा गैरव्यवहारास आळा बसण्यासाठी आदिवासी भागातील शिधावाटप केंद्रे प्राधान्यांने आदिवासी महिलांच्या बचतगटाकडे चालविण्यासाठी देण्यात यावी किंवा द्वारपोच योजना शासनामार्फत राबविण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

(२५) आदिवासी शाळेंना जोडलेल्या २८ औद्योगिक प्रशिक्षण संस्था व ६० आदिवासी विभागातील औद्योगिक विकास प्रशिक्षण संस्था अशा एकूण ८८ आयटीआय असून त्यातील ४२३ त्यापैकी २६७ पदे कार्यरत असून १४६ रिक्त पदे असून यामध्ये शिकविणारे सर्व प्रशिक्षण करार पद्धतीवर असून अतिदुर्गम भागात व्यवसाय औद्योगिक प्रशिक्षण देऊन अनेक विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार व कुशल करागीर म्हणून नोकऱ्या मिळालेल्या असून अवघ्या ५ हजार वेतनावरती काम करत आहे. त्यामुळे शासन निर्णयानुसार वेतन वाढ करून पदे मंजूर करून त्यांना नियमित करण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.

# परिशिष्ट
## (समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त)

बुधवार, दिनांक २८ व गुरुवार, दिनांक २९ एप्रिल २०१०

समितीची बैठक आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक येथे झाली.
सदरहू बैठकीस खालील सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

उपस्थिती

(१) श्री. सुरेश धस, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. आनंदराव गेडाम, वि.स.स.
(३) श्री. रामरतनबापु राऊत, वि.स.स.
(४) श्रीमती निर्मला गावित, वि.स.स.
(५) श्री. राजाराम ओझरे, वि.स.स.
(६) श्री. जगदीशचंद्र वळवी, वि.स.स.
(७) श्री. उमाजी बोरसे, वि.स.स.
(८) श्री. चिंतामण वनगा, वि.स.स.
(९) श्री. दौलत दरोडा, वि.स.स.
(१०) श्री. धनराज महाले, वि.स.स.
(११) श्री. रमेश शेंडगे, वि.स.स.
(१२) श्री. परशुराम उपरकर, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. म. मु. काज, उप सचिव
(२) श्री. ला. ना. जाधव, अवर सचिव (समिती)
(३) श्री. आ. ब. रहाटे, कक्ष अधिकारी

**आदिवासी विकास विभाग, मंत्रालय :**

(१) श्री. म. प्र. सिंह, सह सचिव

**आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक :**

(१) श्री. ज्ञा. स. राजुरकर, आयुक्त
(२) श्री. पां. द. करवंदे, अपर आयुक्त, ठाणे
(३) श्री. प्रकाश महाजन, अपर आयुक्त, नाशिक
(४) श्री. जी. पी. गरड, अपर आयुक्त, अमरावती

(५) श्री. गिरिश सरोदे, प्रकल्प अधिकारी, नागपूर

(६) श्री. राजेंद्र केंद्रे, प्रकल्प अधिकारी, यावल

(७) श्री. केशव बावनकर, प्रकल्प अधिकारी, देवरी

(८) श्री. तानाजी बा. पावडे, प्रकल्प अधिकारी, राजूर

(९) श्री. महेंद्र मा. खोजरे, प्रकल्प अधिकारी, अकोला

(१०) श्री. एस. रमेशकुमार, प्रकल्प अधिकारी, धारणी

(११) श्री. अशोक कुमार, प्रकल्प अधिकारी, भामरागड

(१२) श्री. ए. टी. अहिर, सहायक संचालक

(१३) श्री. इ. न. खाटीक, प्रकल्प अधिकारी, जव्हार

(१४) श्री. र. वि. भोईर, उप आयुक्त (शिक्षण), नाशिक

(१५) श्री. एस. एस. ठुबे, प्रकल्प अधिकारी, तळोदा

(१६) श्री. रा. अ. शिंपी, प्रादेशिक पाणीपुरवठा विभाग, नाशिक

(१७) श्री. अ. अ. चव्हाण, प्रभारी प्रकल्प अधिकारी, नंदुरबार

(१८) श्री. बी. डी. जैन, प्रकल्प अधिकारी, पेण

(१९) श्री. मधुकर गायकवाड, प्रकल्प अधिकारी, औरंगाबाद

(२०) श्री. ए. बी. रामटेके, प्रभारी प्रकल्प अधिकारी, चंद्रपूर

(२१) श्री. ज्ञानेश्वर एकापुरे, प्रभारी प्रकल्प अधिकारी, चमुर

(२२) श्री. बे. स. सलामे, प्रभारी प्रकल्प अधिकारी, घोडेगाव, जि. पुणे

(२३) श्री. आय. एम. हाळणे, प्रभारी प्रकल्प अधिकारी,

(२४) श्री. डी. एन. सोनवणे, प्रभारी प्रकल्प अधिकारी, नाशिक.

**जिल्हा परिषद, नाशिक :**

(१) श्री. शां. का. भदाणे, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, नाशिक

**सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक :**

(१) श्री. उ. प्र. देबडवार, अधीक्षक अभियंता

समितीने या बैठकीत आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांच्या सरळसेवा भरती, बढती, आरक्षण व अनुशेष याबाबत तसेच आदिवासी जमातीकरिता राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत अपर आयुक्त निहाय माहिती घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली.

शुक्रवार, दिनांक ३० एप्रिल २०१०

समितीची बैठक आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक येथ आढावा बैठक घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती**

(१) श्री. सुरेश धस, वि.स.स.
(२) श्रीमती निर्मला गावित, वि.स.स.
(३) श्री. राजाराम ओझरे, वि.स.स.
(४) श्री. जगदीशचंद्र वळवी, वि.स.स.
(५) श्री. उमाजी बोरसे, वि.स.स.
(६) श्री. चिंतामण वनगा, वि.स.स.
(७) श्री. दौलत दरोडा, वि.स.स.
(८) श्री. धनराज महाले, वि.स.स.
(९) श्री. रमेश शेंडगे, वि.स.स.
(१०) श्री. परशुराम उपरकर, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(४) श्री. म. मु. काज, उप सचिव
(५) श्री. ला. ना. जाधव, अवर सचिव (समिती)
(६) श्री. आ. ब. रहाटे, कक्ष अधिकारी

**आदिवासी विकास विभाग :**

(१) श्री. म. प्र. सिंह, सह सचिव

**आदिवासी विकास आयुक्तालय :**

(२) श्री. ज्ञा. रा. राजुरकर, आयुक्त
(३) श्री. अरविंद कुमार झा, आयुक्त, आदिवासी संशोधन प्रशिक्षण संस्था
(४) श्री. अ. बा. लांडगे, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक
(५) श्री. उ. प्र. देबडवार, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक
(६) श्री. ह. क. गोसावी, अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधार, स्थानिक स्तर
(७) श्री. टी. के. बागुल, व्यवस्थापकीय संचालक, म.रा.स.आ.वि. महामंडळ
(८) श्री. प्र. म. महाजन, अपर आयुक्त, नाशिक
(९) श्री. पां. द. करवंदे, अपर आयुक्त, ठाणे
(१०) श्री. डी. आर. परिहार, सह संचालक, आ.स.प्र.स., पुणे
(११) श्री. व्र. सु. पाटील, सह आयुक्त, नागपूर
(१२) श्री. जी. पी. गरड, अपर आयुक्त, अमरावती
(१३) श्री. गिरीश सर्वोदय, प्रकल्प अधिकारी, नागपूर
(१४) श्री. ईश्वर स. चौधरी, अधीक्षक अभियंता, कडा, नाशिक
(१५) श्री. दे. त्र्यं. तेल्हारकर, अधीक्षक अभियंता, नाशिक ग्रामीण
(१६) श्री. सी. ए. जगताप, व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ
(१७) श्री. बा. बा. पावडे, प्रकल्प अधिकारी, राजुर

(१८) श्री. मधुकर गायकवाड, प्रकल्प अधिकारी, औरंगाबाद
(१९) श्री. सुरेश शिंदे, प्रकल्प अधिकारी, गडचिरोली
(२०) श्री. एन. एस. मांदळे, महाव्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ
(२१) श्रीमती सु.अ. शेवाळे, उप संचालक, जात पडताळणी समिती, नाशिक
(२२) श्री. वं. खं. महावरकर, सह आयुक्त, अ.ज.प्र.प.स., पुणे
(२३) श्री. आ. स. गुंजाळ, सह आयुक्त, अ.ज.प्र.स., नाशिक
(२४) श्री. डी. डी. मायी, सह आयुक्त, औरंगाबाद
(२५) श्री. रा. स. वळवी, सह आयुक्त, अ.ज.प्र.त., नंदुरबार
(२६) श्री. सु. भा. हिंगोणेकर, सह आयुक्त, अ.ज.प्र.त.स., ठाणे
(२७) श्री. शां. का. भदाणे, कार्यकारी अभियंता, ल.पा. पश्चिम जिल्हा परिषद, नाशिक
(२८) श्री. उ. रा. राजुरे, कार्यकारी अभियंता, ल.पा. स्थानिक स्तर, नाशिक
(२९) श्री. गजेंद्र केंद्रे, प्रकल्प अधिकारी, यावल
(३०) श्री. लोमेश स. सलामे, प्रभारी प्रकल्प अधिकारी, घोडेगाव
(३१) श्री. बाळासाहेब जैन, प्रभारी प्रकल्प अधिकारी, पेण
(३२) श्री. केशव बावणकर, प्रकल्प अधिकारी, देवरी
(३३) श्री. उ. भा. भोरात, वरिष्ठ संशोधन अधिकारी
(३४) श्री. अनंत एम. महाजन, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., नाशिक
(३५) श्री. अ. अ. चव्हाण, प्रभारी प्रकल्प अधिकारी, नंदुरबार
(३६) श्री. एस.एस. ठुबे, प्रभारी प्रकल्प अधिकारी, तळोदा
(३७) श्री. इ. जी. भालेराव, प्रकल्प अधिकारी, कळवंद
(३८) श्री. जे. एम. उदमल्ले, प्रादेशिक व्यवस्थापक, नाशिक
(३९) श्री. उन्मेश महाजन, उप जिल्हाधिकारी, नाशिक
(४०) श्री. निलेश सागर, उ.वि.अ., नाशिक
(४१) श्री. भाऊसाहेब दांडगे, जिल्हा पुरवठा अधिकारी, नाशिक
(४२) श्री. जे. के. देवरे, शिक्षणाधिकारी प्राथमिक
(४३) श्री. ए. ए. भांगरे, उप शिक्षणाधिकारी माध्यमिक
(४४) श्री. एस. बी. सुरवाळे, अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य, वि.मं. अर्बन सर्कल, नाशिक
(४५) श्री. रा. ल. पालवे, उप अभियंता, जि.प.ल.पा., दिंडोरी
(४६) श्री. सी. डी. वाघ, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कळवण
(४७) श्री. बी. के. मेढे, नियोजन अधिकारी
(४८) श्री. के. यु. जिरे, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) नाशिक
(४९) श्री. महेशकुमार मेघमले, प्रकल्प अधिकारी, किनवट
(५०) डॉ. ए. एस. मोरे, जिल्हा आरोग्य अधिकारी, नाशिक.

समितीने या बैठकीत आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक, अपर आयुक्त संबंधित यंत्रणाचे सर्व अधिकारी यांच्या समवेत अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांच्या सरळसेवा भरती, बढती, आरक्षण व अनुशेष याबाबत तसेच आदिवासी जमातीकरिता राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत दिनांक २८ व २९ एप्रिल २०१० रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने आढावा घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली.

मंगळवार, दिनांक ६ जुलै २०१०

समितीची बैठक विधानभवन, मुंबई येथे सकाळी ११-३० वाजता घेण्यात आली होती. सदरहू बैठकीस पुढील सदस्य उपस्थित होते :—

## उपस्थिती

**समिती प्रमुख :**

(१) श्री. सुरेश धस, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. रामरतनबापु राऊत, वि.स.स.

(३) श्री. जगदीशचंद्र वळवी, वि.स.स.

(४) श्री. उमाजी बोरसे, वि.स.स.

(५) ॲड. चिंतामण वनगा, वि.स.स.

(६) श्री. धनराज महाले, वि.स.स.

(७) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.

(८) श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. म. मु. काज, उप सचिव,

(२) श्री. ला. ना. जाधव, अवर सचिव (समिती).

**उपस्थित अधिकारी :**

(१) श्री. उत्तम खोब्रागडे, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग

(२) श्री. ज्ञा. स. राजुरकर, आयुक्त, आदिवासी विकास महामंडळ, नाशिक

(३) श्री. पां. द. करवंदे, अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, ठाणे

(४) श्री. जी. पी. गरड, अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, अमरावती

(५) श्री. गिरिश सरोदे, उप आयुक्त, नागपूर

(६) श्री. एम. जी. रापोर्त, सहायक, तंत्रशिक्षण संचालनालय

(७) श्री. ज. द. भुतांगे, संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय

(८) श्री. टी. के. बागुल, व्यवस्थापकीय संचालक, आदिवासी विकास महामंडळ, नाशिक

(९) श्री. पी. पी. धारुरकर, उप संचालक, आरोग्य, नाशिक

(१०) श्री. अनिल लांडगे, अतिरिक्त मु. का. अ. जि. प., नाशिक.

(११) श्री. न. प्र. सिंह, सह सचिव, आदिवासी विकास विभाग

(१२) श्री. यु. ना.रणखांबे, उप सचिव, सा.प्र.वि.

(१३) श्री. दि. रा. डिंगळे, अवर सचिव

(१४) श्री. डी. टी. तेल्हारकर, अधीक्षक अभियंता, महावितरण, नाशिक (ग्रा.)

(१५) श्री. मु. पी. खेडकर, अधीक्षक अभियंता, सा.बां.वि.मं., नाशिक

(१६) श्री. एस. जी. जाधव, अधीक्षक अभियंता, सा.बां.वि., ठाणे

(१७) श्री. ए. डी. येवला, प्रा.प.आ. नाशिक

(१८) श्री. कुंदन बी. दंडगव्हाळ, उप अभियंता, एमएसआरडीसी

(१९) श्री. के. व्ही. जिरे, कार्यकारी अभियंता, सा.बां.वि., उत्तर नाशिक

(२०) श्री. पी. आर. ठाकूर, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, जि.प., नाशिक

(२१) श्री. एस. एस. बाविस्कर, कार्यकारी अभियंता, ल.पा.जि.प., नाशिक

(२२) श्री. आर. जे. परदेशी, कार्यकारी अभियंता (वि) सा.बां., औरंगाबाद

(२३) श्री. आर. एम. गंगावणे, प्रभारी उप कार्यकारी अभियंता, एमएसआरडीसी, जि.प., नाशिक

समितीने या बैठकीत आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक येथे झालेल्या बैठकीच्या वेळी अनुसूचित जमातीकरिता राबविण्यात येणाऱ्या योजना व आढळून आलेल्या त्रुटी तसेच अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष इत्यादीबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

समितीची बैठक शुक्रवार दिनांक २३ जुलै २०१० रोजी दुपारी २-०० वाजता विधानभवन, मुंबई येथे घेण्यात आली. सरदहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते :—

**उपस्थिती**

(१) श्री. सुरेश धस, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. जगदीशचंद्र वळवी, वि.स.स.

(३) श्री. उमाजी बोरसे, वि.स.स.

(४) ॲड. चिंतामण वनगा, वि.स.स.

(५) श्री. दौलत दरोड, वि.स.स.

(६) श्री. धनराज महाले, वि.स.स.

(७) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.

(८) श्री. परशुराम उंपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. म. मु. काज, उप सचिव,

(२) श्री. ला. ना. जाधव, अवर सचिव (समिती).

समितीने या बैठकीत प्रारुप अहवालावर विचार केला व तो संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय , मुंबई